cmyk

## संपादकीय

### कशी केलीस दैना...!

नियोजित वेळेच्या आधी १६ दिवस महाराष्ट्रासह मुंबईत मान्सूनचा पहिला पाऊस धोधो बरसल्याने मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडाली. मुंबईची तुंबई झाली. जिकडेतिकडे पाणीच पाणी झाल्याने नागरिकांची 'आता जाऊ कुणीकडे' अशी स्थिती झाली. मोसमी पाऊस तळकोकणात दाखल झाला असला तरी उत्तर कोकणातील रायगड, मुंबई, ठाणे जिल्हे आणि पश्चिम महाराष्ट्रात सोमवारी पूर्व मोसमी पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यांना पावसाने जोरदार तडाखा दिला. त्यामुळे भीमा, नीरा, बाणगंगा या नद्यांना पूर आला.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३५ | गुरूवार, दि.२९ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### वैष्णवी हगवणेच्या चारित्र्यावर संशय

पुणे : वैष्णवी आत्महत्येप्रकरणी पोलीस कोठीत असलेल्या हगवणे कुटुंबीयांनी वैष्णवीच्या चारित्र्यावर संशय घेतला आहे. आरोपीच्या वकिलांकडून वैष्णवीच्या चारित्र्यावर संशय घेण्यात आला आहे. वैष्णवीच्या मोबाईल चॅटिंग तपासणी करा, अशी आरोपीच्या वकिलांकडून सुनावणीदरम्यान मागणी करण्यात आली आहे. वैष्णवीचे नको त्या व्यक्तीसोबत नको ते चॅट पकडण्यात आले होते. त्यावरून तीने अनेकदा आत्महत्येचा प्रयत्न केला होता असा युक्तीवाद हगवणेच्या वकिलाकडून कोर्टात करण्यात आला आहे.

## थोडक्यात...

### सीबीएसई शाळा ९, तर एसएससी शाळा १६ जूनपासून सुरू होणार

पुणे– सीबीएसई शाळा ९, तर एसएससी शाळा १६ जूनपासून सुरू होणार आहेत. राज्यामध्ये लवकरच शाळांच्या घंटा वाजणार आहेत. तर राज्य मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या शाळा १ जूनपासून सुरू होणार आहेत. उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर पुन्हा एकदा शाळेत परतण्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी सुरु झाली आहे.

### कमल हसन द्रमुकचे राज्यसभेचे उमेदवार

चेन्नई–द्रमुकने तामिळनाडूमधून राज्यसभेसाठी ४ उमेदवारांची घोषणा केली आहे. द्रमुकने राज्यसभेसाठी चित्रपट अभिनेते कमल हसन, कवयित्री सलमा, वकील पी विल्सन आणि एसआर शिवलिंगम यांना उमेदवार म्हणून घोषित केले आहे.

### पाकिस्तानच्या सीमेवरील राज्यांमध्ये आज मॉक ड्रिल

नवी दिल्ली–पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेल्या राज्यांमध्ये दि. २९ मे रोजी संध्याकाळी एक मॉक ड्रिल आयोजित केले जाईल. गुजरात, पंजाब, राजस्थान आणि जम्मू आणि काश्मीरमध्ये मॉक ड्रिल आयोजित केले जातील. या काळात लोकांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले जातील.

### सोलापूर–गोवा विमान सेवेची बुकींग सुरु

सोलापूर–अखेर सोलापूर ते गोवा विमानसेवेच्या तिकीट बुकिंगला सुरुवात झाली आहे. फ्लाय ९१ कंपनीकडून आजपासून तिकीट बुकिंगची सुविधा उपलब्ध. दि. ९ जूनपासून सोलापूर ते गोवा विमानसेवेस प्रारंभ होणार आहे. आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. सोलापूर ते गोवा विमानसेवेसाठी अंदाजे ३५०० रुपयांपासून पुढे तिकिटाचे दर आहेत.

### पुण्यात कोरोनाचे आढळले १८ रुग्ण

पुणे–शहरात कोरोनाचे १८ रुग्ण आढळले आहेत. राज्यात कोरोना विषाणूच्या रुग्णांमध्ये वाढ होत आहे. मंगळवारी (दि. २७) रोजी पुणे महापालिका हद्दीत १८ रुग्ण आढळले आहेत. या सर्व रुग्णांना सौम्य स्वरूपाचा कोरोना असल्याचे राज्याच्या आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. तर जानेवारी २०२५ पासून आतापर्यंत एकूण ४ रुग्णांचा मृत्यू झाला आहे.

# कापसाच्या हमीभावात ५८९ तर सोयाबीनमध्ये ४३६ रुपये दरवाढ

## मोदींकडून शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय; खरीप पिकांच्या एमएसपीत वाढ





### खरीप पिकाच्या एमएसपीमध्ये वाढ

खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्यास मंजूरी देण्यात आली. त्यानुसार, २०२५–२६ या विपणन हंगामासाठी खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ ही २०१८–१९ मधील केंद्रीय अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेशी सुसंगत आहे. त्यामध्ये अखिल भारतीय सरासरी उत्पादन खर्चाच्या किमान १.५ पट किमान आधारभूत किमत निश्चितीबाबत चर्चा करण्यात आली होती. त्यानुसार शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षा सर्वाधिक नफा बाजरी, मका, तूर आणि उडदावर मिळण्याची अपेक्षा आहे. तर उर्वरीत पिकांवर सुद्धा ५० टक्के फायदा होण्याची शक्यता आहे.

### या पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ

सोयाबीन –५ हजार ३२८ रुपये
कापूस (लांब धागा) –८ हजार ११० रुपये
कापूस (मध्यम धागा)– ७ हजार ७१० रुपये
तुर –८ हजार रुपये
मका –२४०० रुपये
हायब्रीड ज्वारी– ३ हजार ६९९ रुपये
मालदांडी ज्वारी –३ हजार ७४९ रुपये

नवी दिल्ली । वृतसंस्था

केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी आनंदवार्ता आणली आहे. मोदी सरकारने २०२५–२६ या विपणन हंगामासाठी खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या १४ पिक उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार असून कापूस ५८९, सोयाबीन ४३६ रुपये तर तिळासाठी ५७९ रुपये प्रति क्विंटल दरवाढ मिळणार आहे. शिवाय तुरीला ८ हजार रुपये हमीभाव जाहीर केला आहे.

बुधवारी मोदी कॅबिनेटची बैठक झाली. दिल्लीत झालेल्या या बैठकीत शेतकऱ्यांसाठी महत्वाचे निर्णय घेण्यात आले. केंद्र २०२५–२६ या विपणन हंगामासाठी खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या १४ पिक उत्पादक

◀◀ पान २ वर

# आर. टी. जिजांना अखेरचा निरोप

## मंत्री पंकजाताई मुंडेंसह मोठा जनसमुदाय उपस्थित



परळी । प्रतिनिधी

माजलगावचे माजी आ. व स्व. गोपीनाथ मुंडे यांचे सच्चे शिलेदार आर. टी. देशमुख यांचे आपघाती निधन झाल्यानंतर दि. २८ मे रोजी परळी येथील स्मशान भुमीत अखेरचा निरोप देण्यात आला. यावेळी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यांसह हजारोंच्या जनसमुदायाच्या उपस्थितीत आणि शोकाकूल वातावरणात त्यांच्यावर

◀◀ पान २ वर

### देशमुख परिवाराला कधीही अंतर देणार नाही–ना.पंकजाताई मुंडे

स्व.आर.टी. देशमुख (जिजा) यांच्यासारखा जीवाभावाचा देवमाणूस आता पुन्हा होणे नाही.



माझ्या संपूर्ण जीवनात एक परिवारातील सदस्य म्हणून त्यांनी सदैव माझ्यावर लेकीसारखी माया केली आणि मी नेतृत्व करताना 'ताईसाहेब' म्हणत नेता म्हणून माझा सन्मान केला. अशा सालस, सोज्वळ व निष्ठावान व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने खूप मोठी हानी झाली आहे. त्यांच्या माघारी देशमुख परिवाराला मी कधीही अंतर देणार नाही अशा शब्दात

◀◀ पान २ वर

# पुत्रप्रेमामुळे मंत्री संजय शिरसाट अडचणीत

## वेदांत हॉटेल खरेदीच्या व्यवहारात गोलमाल?

छ.संभाजीनगर। प्रतिनिधी

खा. संजय राऊत यांनी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. संभाजीनगरमधील वेदांत हॉटेल मुलासाठी कमी पैशात घेतले असा आरोप राऊतांनी केला आहे. या हॉटेलसाठी पैसे खोक्यांमधून आले होते का? असा सवाल त्यांनी केला असून मंत्री संजय सिरसाट हे अडचणीत सापडले असल्याचे चित्र आहे.



सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाटांवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं गंभीर आरोप केले आहेत. संभाजीनगरच्या वेदांत हॉटेल खरेदी प्रकरणात घोटाळा झाल्याचा

◀◀ पान २ वर

# २० वर्षानंतर थेट गृहराज्यमंत्र्यांनीच डान्सबारवर टाकली धाड

## महाराष्ट्रात सर्वात मोठी कारवाई; ४० बारगर्ल आणि ४ वेटरवर गुन्हा दाखल





मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रात डान्सबारवर बंदी आहे. असे असताना देखील महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये छुप्यापद्धतीने डान्स बार सुरु आहेत. डान्स बार विरोधात महाराष्ट्रात पुन्हा एकदा मोठी कारवाई करण्यात आली आहे. नवी मुंबईतील डान्स बारवर थेट गृहराज्यमंत्र्यांनी धाड टाकली आहे. यावेळी ४० बारगर्ल आणि ४ वेटरवर गुन्हा दाखल केला आहे.

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी नवी मुंबईतील वाशी इथल्या अनधिकृत डान्स बारवर धाड टाकली. द रेस अस या डान्सबारचे

◀◀ पान २ वर

# आषाढी वारी सर्व विभागांच्या समन्वयातून यशस्वी करा-मुख्यमंत्री



मुंबई । प्रतिनिधी

पंढरपुरची आषाढी वारी पूर्वापार चालत आलेली परंपरा असून वारी आणि वारकरी राज्याचे वैभव वाढविणारी आहे. यामुळे यंदा पावसाचे आगमन लवकर झाल्याने सर्व मानाच्या पालख्यांना आणि वारकऱ्यांना फिरती शौचालये, पाणी, आरोग्य आणि पोलीस बंदोबस्तासाठी सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी योग्य नियोजन करावे. ही वारी यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने प्रयत्न करण्याचे निर्देश

◀◀ पान २ वर

# गिरीश महाजनांकडे एवढी संपत्ती आली कुठून?

## एकनाथ खडसे यांचा पुन्हा हल्लाबोल

जळगाव । प्रतिनिधी

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते एकनाथ खडसे यांनी पुन्हा एकदा भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. गिरीश महाजन वारंवार माझ्याबाबत फेकाफेकी करत असतात, कोट्यवधीची मालमत्ता गिरीश महाजन यांच्याकडे कशी आली? महाजन हे भाड्याच्या खोलीमध्ये राहत होते, एका



शिक्षकाचा मुलगा आणि एवढी संपत्ती कुठून आली? असा सवाल यावेळी एकनाथ खडसे यांनी केला आहे.

एकनाथ खडसे पुढे म्हणाले, गिरीश महाजन वारंवार माझ्याबाबत फेकाफेकी करत असतात. मागच्या वेळेसही गिरीश महाजन म्हणत होते की कोथळीची

◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: ३४.५० क्विंटल | | |
| २,४०० | २,९५० | २,५९४ |
| ज्वारी/हायब्रिड: ९९.०० क्विंटल | | |
| १,९५१ | २,७७० | २,४२८ |
| मका/लोकल:३३.५०क्विंटल | | |
| ५,३०१ | ६,७०० | ६,४१७ |
| तूर : ९.०० क्विंटल | | |
| ६,००० | ६,७२५ | ६,४७५ |
| उडीद : १.०० क्विंटल | | |
| ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १०८.०० क्विंटल | | |
| २,०६० | ३,४९१ | २,४७७ |
| मुग :४.५० क्विंटल | | |
| ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ५०.५० क्विंटल | | |
| ४,२११ | ४,२७५ | ४,२४५ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | | |
| ५,३८० | ५,४०० | ५,३९५ |

# भारत ४४ हजार कोटींच्या १२ माईन स्विपर खरेदी करणार

## पाकशी असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर नौदलाचा मोठा निर्णय

नवी दिल्ली । वृतसंस्था

भारताचा सात हजार किलोमीटरहून अधिक लांबीचा समुद्र किनारा पाहाता आणि चीन तसेच पाकिस्तानची वाढती नौदल ताकद पाहाता भारतीय नौदलाने हा निर्णय घेतला आहे. ४४ हजार कोटी रुपयांच्या अत्याधुनिक अशा १२ माईन स्विपर (एमसीएमव्ही) खरेदी केल्या जाणार आहेत. त्यामुळे भारतीय नौदलाची ताकद आणखी वाढणार आहे.



भारतास ७,५१६ किमी पेक्षा जास्त लांबीची किनारपट्टी असून हा एक भौगोलिक चमत्कार म्हटला जातो. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागराने वेढलेल्या भारताच्या सीमांची सुरक्षा भारतीय नौदल आणि तटरक्षक दलाकडे आहे.भारतीय नौदलाने अलिकडे पाकिस्तान सोबत झालेल्या तणावाच्या वेळी मोठी कामगिरी केल्याचे म्हटले जात आहे. भारतीय नौदल आता ४४ हजार कोटीची समुद्री सुरुंग शोधून त्यास नष्ट करणारी यंत्रणा असलेली स्वदेशी माईन काऊंटर मेजर

◀◀ पान २ वर

### काय आहे एमसीएमव्ही आणि त्यात खास काय ?

माईन काऊंटर मेजर वेसल्स म्हणजे एक खास प्रकारची नौदलाची नौका आहे, जी समुद्राच्या खाली पेरलेले सुरुंग शोधून काढून त्यांना नष्ट देखील करते. या नौका अंदाजे ६० मीटर लांबीच्या आहेत आणि १००० टनांपर्यंत वजनाची आहेत. पारंपारिक युद्धनौकांपेक्षा त्या लहान दिसू शकतात, युद्धाच्या वेळी त्यांची भूमिका निर्णायक ठरू शकते. या जहाजांमध्ये अँडव्हान्स सोनार, रोबोटिक उपकरणे आणि नॉन–मॅग्नेटिक मटेरियल वापरले जाते, जेणेकरून शत्रूचे सुरुंग या जहाजांना ट्रिगर करू शकणार नाहीत.

### सध्या भारताकडे एकही एमसीएमव्ही नाही

भारतीय नौदलाकडे सध्या एकही माईन स्वीपर नाही. जुने माईन स्वीपर अनेक वर्षांपूर्वी निवृत्त झाले आहेत. अशा परिस्थितीत, हा प्रकल्प केवळ धोरणात्मक दृष्टिकोनातून महत्त्वाचा नाही, तर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून देखील आवश्यक बनला आहे.

cmyk

## अग्रलेख

# कशी केलीस दैना...!

नियोजित वेळेच्या आधी १६ दिवस महाराष्ट्रासह मुंबईत मान्सूनचा पहिला पाऊस धोधो बरसल्याने मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडाली. मुंबईची तुंबई झाली. जिकडेतिकडे पाणीच पाणी झाल्याने नागरिकांची 'आता जाऊ कुणीकडे' अशी स्थिती झाली. मोसमी पाऊस तळकोकणात दाखल झाला असला तरी उत्तर कोकणातील रायगड, मुंबई, ठाणे जिल्हे आणि पश्चिम महाराष्ट्रात सोमवारी पूर्व मोसमी पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यांना पावसाने जोरदार तडाखा दिला. त्यामुळे भीमा, नीरा, बाणगंगा या नद्यांना पूर आला. चंद्रभागेस पूर आल्याने पंढरपूरमध्ये दक्षतेचे आदेश देण्यात आले. सातारा आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील दुष्काळी पट्ट्यातही पावसाने धुमाकूळ घातला. कोकणातील कुंडलिका, पाताळगंगा, सावित्री या नद्यांच्या पातळीत वाढ झाली. मुंबईत रविवारी रात्रीपासूनच सुरू झालेल्या पावसाने संततधार कायम ठेवत मुंबईची दाणादाण उडवली. पहिल्याच पावसात मुंबईची दैना झाली. रस्तेवाहतुकीचा बोजवारा उडाला, तर मध्य रेल्वेला जोरदार फटका बसला. हार्बर रेल्वेसेवा सीएसएमटी ते वडाळापर्यंत दुपारपर्यंत ठप्प होती. राज्यात पहिल्याच पावसाने दोन बळी घेतले. मुंबईत मे महिन्यात १०० वर्षांतील सर्वाधिक पावसाची नोंद झाली. इतिहासात मंत्रालयात प्रथमच पाणीच पाणी झाले,

तर काही दिवसांपूर्वीच उद्घाटन करण्यात आलेल्या वरळीतील आचार्य अत्रे चौक हे भूमिगत मेट्रो स्थानक जलमय झाले. मुंबईतील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेल्या भुयारी मेट्रोच्या कामाची पहिल्याच पावसाने पोलखोल केली. ॲक्वा मार्ग-३ला पावसाचा फटका बसला. आचार्य अत्रे चौक वरळी मेट्रो स्थानकाच्या आत पावसाचे पाणी शिरले. भुयारी मेट्रो मार्गाच्या पाय-यांवरूनही पाणी वाहू लागल्याने हे मेट्रो स्थानक आहे की धबधबा असा प्रश्न निर्माण झाला. मुंबईत अनेक ठिकाणी रस्ते जलमय झाले, झाडे कोसळली. राज्याचा कारभार चालणा-या मंत्रालयात इतिहासात प्रथमच गुडघाभर पाणी तुंबल्याने एकच तारांबळ उडाली. मंत्रालयात पाणी शिरल्याने महायुतीच्या कारभारावर ताशेरे ओढले गेले. मुंबईत १८ ठिकाणी शॉर्टसर्किटच्या घटना घडल्या. ३२ ठिकाणी झाडे कोसळली तर पाच ठिकाणी भिंत कोसळण्याच्या घटना घडल्या. मान्सूनचा तडाखा मुंबई, पुणे, सोलापूर, कर्नाटकातील कलबुर्गी, तेलंगणातील मेहबूबनगर आणि आंध्र प्रदेशातील कावलीपर्यंत बसला आहे. पुढील तीन दिवसांत मान्सून महाराष्ट्राच्या ब-याच भागात तसेच कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा, बंगालचा उपसागर आणि ईशान्य भारतात आणखी वेगाने पुढे सरकेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. पावसाने निर्माण झालेल्या परिस्थितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्यपूर्णरीत्या आढावा घेत आहेत.

नागरिकांना मदत करण्यासाठी संपूर्ण प्रशासनाला अलर्ट मोडवर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मान्सूनचे केरळात १ जूनला तर मुंबईत १० जूनपर्यंत आगमन होईल अशी अपेक्षा होती. परंतु अनुकूल वातावरणीय परिस्थितीमुळे आठ दिवस आधीच केरळात मान्सूनचे आगमन झाले आणि अवघ्या २४ तासांत वा-याच्या वेगाने मान्सून महाराष्ट्रात पोहोचला. त्यामुळे मुंबईची अक्षरश: दाणादाण उडाली. मान्सूनचे आगमन जवळपास दहा ते बारा दिवस आधी झाल्याने मुंबई, कोकणसह महाराष्ट्रातील अनेक भागात पावसाने दमदार हजेरी लावली. ऐन मे महिन्यात पाऊस आल्याने पावसाळ्याच्या जून-जुलै महिन्यात पाऊस असेल की नाही अशी शंका आतापासूच व्यक्त केली जात आहे. हवामान खाते पाऊस येणार असे सांगते आणि नंतर पाऊस येत नाही असा आजवरचा अनुभव होता. परंतु यावेळी मान्सून लवकर दाखल झाला, मग तो आता लवकर जाणार का अशी शंका व्यक्त केली जात आहे. यावर हवामानतज्ज्ञ कृष्णानंद होसाळीकर म्हणाले, पाऊस म्हणजे नळ नाही नळ चालू केला की पावसाला सुरुवात आणि बंद केला की पाऊस बंद असे होत नाही. पावसासाठी समुद्रात निर्माण होणारी स्थिती आणि भौगोलिक स्थिती या दोन्ही गोष्टी आवश्यक असतात. वेळेआधी आलेला पाऊस आणि त्याच्या पीछेहाटीचा तसा कोणताही संबंध नाही. पावसाचा वेग विविध स्थितीवर अवलंबून असतो. पावसाचा आवेग ओसरला की, कदाचित एक-दोन दिवस तो पडणारही नाही.

पण पुन्हा पावसासाठी पोषक स्थिती निर्माण झाली की पावसाचा जोर वाढेल. यंदा मोसमी वा-यांनी अत्यंत वेगाने केलेली वाटचाल दुर्मिळ असल्याचे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. गत काही वर्षांत पाऊस येण्याचे निकष बदलले आहेत, पावसाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. पूर्वी उपग्रह नसताना अंदाज वर्तवण्याचे स्वरूप मर्यादित होते, आता उपग्रहामुळे अंदाज वर्तवण्याची क्षमता वाढली आहे. गत आठ वर्षे पाऊस सर्वसाधारण होता. त्यामुळे यंदा आलेला पाऊस लवकर वाटतो आहे. पाऊस लवकर आला म्हणजे फार काही वेगळे घडले असे नाही. यापूर्वी अशा घटना घडलेल्या आहेत. केरळमध्ये मोसमी वारे दाखल झाल्यानंतर महाराष्ट्रात येण्यासाठी आठ-दहा दिवस लागतात हे आपण माणसांनी ठरवले आहे. मात्र, निसर्गाची अनेक रहस्ये अजून उलगडलेली नाहीत. निसर्ग माणसांच्या नियमांनी चालत नाही, म्हणूनच दरवर्षी वेगळी करामत दिसून येते. त्याप्रमाणे पाऊस लवकरही येऊ शकतो हे निसर्गाने दाखवून दिले आहे. अंदाज वर्तवण्यात आव्हाने आहेत, ती असलीच पाहिजेत, त्यातूनच नवे काही शिकता येते, नवे काही घडू शकते. २७ मे पासून मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होईल असा अंदाज आहे. राज्यातील हवामान हळूहळू कोरडे होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढ होईल. मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. ५ जूनपर्यंत ही स्थिती कायम राहील असा अंदाज आहे.

देशातील इतर भागातसुद्धा मान्सूनचा प्रवास तात्पुरता थांबू शकतो. आपल्या भागात मान्सून लवकरच दाखल होईल अशी अपेक्षा करून अथवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतक-यांनी पेरणीची घाई करू नये. कारण हवामान कोरडे होण्याची शक्यता असल्याने पेरणीची घाई केली तर शेतक-यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे कृषी विभागाने म्हटले आहे. नाहीतरी ब-याच ठिकाणी मशागतीची कामेच झाली नाहीत, त्यामुळे पेरणी करणे शक्य होणार नाही. असो. सध्या तरी पर्जन्यजोरामुळे 'कशी केलीस माझी दैना' असे म्हणावे लागत आहे.

# सार्वजनिक स्वच्छतागृहच नाहीत तर पाटोदा शहर स्वच्छ शहर कसे होईल?

**पाटोदा। प्रतिनिधी**

देशभरात 'स्वच्छ भारत अभियान' गाजतोय, सरकार कोट्यवधींचा निधी खर्च करतंय, पुरस्कार जिंकले जातायत, पण पाटोदा शहरातील वास्तव मात्र या सगळ्याच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. शहरातील मुख्य रस्ता, तहसील कार्यालय, पंचायत समिती, पोलीस स्टेशन समोर,अगदी नगरपंचायत कार्यालयाच्या परिसरातही एकही सार्वजनिक स्वच्छतागृह उपलब्ध नाही.या सुविधेच्या अभावामुळे तालुका भरातून सरकारी कामासाठी येणाऱ्या नागरिकांना प्रचंड हाल सहन करावे लागत आहेत. महिलांसाठी तर ही परिस्थिती अधिकच गंभीर आहे त्यांना सुरक्षित आणि सन्मानाने स्वच्छता सुविधा मिळत नाही, ही बाब लाजीरवाणी आहे.उपविभागीय अधिकारी व तहसिल कार्यालया बाहेर सुद्धा स्वच्छतागृह नाही, ही बाब प्रशासनाच्या नियोजन शून्यता आणि उदासीनतेची जळजळीत साक्ष आहे. 'स्वच्छता' ही फक्त बैठकीपुरती आणि सेल्फी पोस्टपुरती मर्यादित राहिली आहे, हे चित्र स्पष्ट दिसतंय याचे परिणाम पाटोदा तालुक्यातील नागरिक उघड्यावर किंवा खाजगी जागांमध्ये जावं लागतं ही लोकप्रतिनिधींनी गंभीरपणे गोष्ट घेतली पाहिजे यामुळे महिलांच्या सुरक्षिततेवर आणि सन्मानावर गदा.शहरात दुर्गंधी, अस्वच्छता आणि आजार वाढण्याचा धोका.बाहेरून येणाऱ्या नागरिकांवर वाईट प्रभाव पाटोदा शहराची प्रतिमा मलिन होते. यामुळे नागरिकांचा प्रशासनाला सवाल १. स्वच्छ भारत नावाने निधी येणारा कुठे जातो? २. नगरपंचायत कार्यालयाला बाहेर स्वतःचं शौचालय नसेल, तर इतरांची काय अपेक्षा करायची? ३. इतक्या वर्षात शासकीय कार्यालया बाहेर एकही सार्वजनिक स्वच्छतागृह का उभारता आलं ना? आता वेळ आली आहे घोषणा नव्हे, कृतीची! स्वच्छ शहर हवं असेल तर रस्त्यावर, शासकीय कार्यालयांमध्ये आणि मुख्य सार्वजनिक ठिकाणी तत्काळ स्वच्छतागृहांची उभारणी करणं ही काळाची गरज आहे. अन्यथा 'स्वच्छ भारत' ही योजना लोकांच्या डोळ्यांपुढे फसव्या आश्वासना सारखी वाटू लागली असल्याने प्रशासनाने उपाययोजना स्वच्छ शहराचं स्वप्न फक्त पोस्टरवर नाही ते जमिनीवर उतरवण्यासाठी प्रशासनाने तात्काळ पावलं उचलावीत.

# युवा नेते जयदत्त धस यांच्याकडून अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानग्रस्त गावाची पाहणी



**बीड । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील रविवार पासून सलग तीन दिवस झालेल्या अवकाळी पावसाच्या तडाख्याने नुकसान झालेल्या गावातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आ.सुरेश धस यांच्या वतीने युवानेते जयदत्त आणि त्यांच्या टीमने या भागात झालेल्या नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे.**

आष्टी तालुक्यातील सीना नदीच्या काठावरील साकत, खुंटेफळ (वाटेफळ) लोणी, कोयाळ या गावांमध्ये सोमवारी रात्रभर झालेल्या अवकाळी पावसामुळे नदी पात्रात मोठ्या प्रमाणावर पाण्याचा ओघ वाढल्याने भीषण पूरस्थिती निर्माण झाली आहे. नदीवरील बंधाऱ्यांमधून पाणी ओव्हरफ्लो झाल्याने नदीपात्र फुटून परिसरातील शेतांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी शिरले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे कांदा, ऊस, मका व फळबागांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक शेतांचे रस्ते पूर्णपणे वाहून गेले असून, काही भागांत विहिरी पाण्यात बुजल्या आहे. सोलर पंप व कांद्याच्या चाळी पाण्याखाली गेल्या आहेत. विशेष म्हणजे शेतकऱ्यांनी जनावरांसाठी साठवलेला मुरघासही या पाण्यात मिसळला असून अंदाजे दीडशे ते दोनशे टन मुरघास वाया गेला आहे. या घटनेची माहिती मिळताच युवा नेते जयदत्त धस यांनी तातडीने प्रशासनाला सोबत घेऊन पूरग्रस्त गावांची पाहणी केली. यावेळी तहसीलदार मॅडम यांच्याशी संपर्क साधून तलाठी, कृषी सहाय्यक व ग्रामसेवक यांना तातडीने घटनास्थळी पाठवले आणि पंचनाम्याचे काम त्वरित सुरू केले. साकत हे गाव अहिल्यानगर-सोलापूर हायवेपासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असून या गावाचा मिरजगाव व अहिल्यानगर शहराशी दळणवळणाचा दैनंदिन संपर्क असतो. मात्र, पुरामुळे रस्ता पूर्णपणे वाहून गेल्याने गावाचा संपर्क तुटला आहे. याबाबत जयदत्त धस यांनी तातडीने संबंधित विभागाशी संपर्क साधून रस्ता पुनर्बांधणीसाठी आवश्यक कार्यवाहीची विनंती केली आहे. या पाहणी दरम्यान श्री.उद्धव मोढवे पाटील, श्री.जयसिंग गव्हाणे, श्री.दादा शिंदे, श्री.बाळासाहेब कावरे,सरपंच श्री.सासवडे सर, सरपंच रक्ताटे,अमरल फौजी, दत्ता गुंड, अमोल गुंड,श्री.नीलकंठ रक्ताटे, श्री.मयुर मोढवे,श्री.राजु खुरांगे,श्री.दीपक शिंदे, गावातील शेतकरी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यासह स्थानिक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# जवळा येथील सोलर पॅनल चोरीला



दिंद्रुड। प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील फकीर जवळा येथील शेतकरी राहुल रत्नदीप जवळेकर यांच्या शेतातील सोलार पाट्या चोरीस गेल्या आहेत अज्ञान तो त्यांनी दोन दिवसापूर्वी २६ मे च्या रात्री चोरून नेल्या असल्याचे निदर्शनास आले.

## पान १ वरून...

### कापसाच्या हमीभावात

शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल. त्यांच्या पिकाला दाम मिळेल. त्यांचे नुकसान टळेल. यासोबतच इतरही चांगले निर्णय मोदी सरकारने घेतले आहे. मोदी सरकारने बुधवारी २०२५-२६ विपणन हंगामासाठी खरीप पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे बाजार भावापेक्षा शेतकऱ्यांना चांगला भाव मिळण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यांच्या शेतकी उत्पादनाला, मालाला चांगला भाव मिळण्याची एकप्रकारे हमी देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. २०२५-२६ साठी खरीप पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ करण्याचा निर्णय मोदी कॅबिनेटने जाहीर केला. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीने १४ खरीप पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ करण्यास मंजूरी दिली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना कृषी मालासाठी चांगला दर मिळण्याची शक्यता आहे.

--------------

### पुत्रप्रेमामुळे मंत्री संजय

आरोप संजय राऊत यांनी केला. वेदांत हॉटेल संजय शिरसाटांच्या मुलाच्या नावे खरेदी व्यवहार झाल्याचा दावा राऊतांनी केला. बाजारभावानुसार हॉटेल वेदांतची किंमत कितीतरी अधिक असताना हे हॉटेल ६७ कोटींना खरेदी केल्याचे राऊतांचे म्हणणे आहे. हॉटेलचा हा व्यवहार खोक्याच्या पैशांतून झाला का असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे.

--------------

### आर. टी. जिजांना

अंत्यसंस्कार करण्यात आले. गेल्या काही दशकापासून बीड जिल्ह्यातील चार नेते रस्ते आपघातात गेले असून त्यामुळे जिल्ह्याची मोठी हानी झाली आहे. अगोदर रघुनाथ मुंडे त्यानंतर गोपीनाथ मुंडे, विनायक मेटे आणि आता माजी आ. आर. टी. देशमुख यांचे रस्ते आपघाताने निधन झाले आहे. लातूर जिल्ह्यातील औसा-तुळजापूर रस्त्यावर अचानक गाडी स्लिप होऊन चार पलटी होऊन झालेल्या आपघातात उपचारादरम्यान आर. टी. देशमुख यांचे निधन झाले आहे. दि. २८ मे रोजी दुपारी परळी येथील स्मशानभुमीत त्यांच्यावर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

--------------

### देशमुख परिवाराला कधीही अंतर

राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी स्व.आर.टी. देशमुख यांना अखेरचा निरोप दिला.

माजलगाव मतदार संघाचे माजी आमदार आर. टी. देशमुख यांचे परवा दुर्दैवी अपघाती निधन झाले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आपले सर्व कार्यक्रम व दौरै रद्द करून त्या या कुटुंबाला आधार देत तीन दिवस परळीतच थांबल्या. स्व.आर.टी. देशमुख यांच्या पार्थिवावर आज शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. ना. पंकजाताई मुंडे यांनी सरकारच्या वतीने त्यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त करताना पंकजाताई मुंडे भावूक झाल्या होत्या. त्यांनी सांगितले की, दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्यापासून आमचे देशमुख परिवाराशी पारिवारिक स्नेहबंधाचे नाते आहे. माझ्या जीवनातील प्रत्येक बाबीत जिजा हे कुटुंबातील सदस्यां प्रमाणेच आमचे आधारवड राहिलेले आहेत. राजकीय, सामाजिक व कौटुंबिक अशा सर्व स्तरावर भक्कम आधार देत त्यांनी मुंडे साहेबांपासून व नंतर माझ्यासोबत अतिशय निष्ठेने, तळमळीने व प्रामाणिकपणे काम केले. मुंडे साहेबांच्या जाण्यानंतर त्यांनी सदैव माझा ताईसाहेब असाच उल्लेख केला. गेल्या २०-२२ वर्षात एकदाही त्यांना रागावल्याचे मी पाहिलेले नाही. असा सालस, सोज्वळ आणि निष्ठावंत ज्येष्ठ सहकारी गेल्याचे अतीव दुःख आहे. स्व. जीजांनी माझ्यावर लेकीसारखे प्रेम केले आणि नेता म्हणून नेहमीच सन्मान राखला. एक लेक म्हणूनच या परिवाराशी आयुष्यभर आपला स्नेह राहणार असुन जिजांच्या जाण्यानंतर देशमुख परिवाराला आपण कधीही अंतर देणार नाही असं नामदार पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.

-----------

### गिरीश महाजनांकडे

ग्रामपंचायत खडसेंची नाही म्हणून, पण त्यांना सांगायचे आहे की गेल्या ३७ वर्षांपासून कोथळीची ग्रामपंचायत माझ्या ताब्यात आहे. मंदाकिनी खडसे या जेलमध्ये जाणार होत्या, पण मी त्यांना वाचवले असेही गिरीश महाजन यांनी म्हटले होते. मला जामीन मिळाला तो सुप्रीम कोर्टातून मिळाला, मग महाजन एवढे का फेकत आहेत? असा टोला यावेळी खडसे यांनी महाजन यांना लगावला. मला आणि माझ्या बायकोला जेलमध्ये पाठवण्यासाठी त्यांनी जंग जंग पछाडले, असा आरोपही यावेळी खडसे यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, कोट्यवधीची मालमत्ता गिरीश महाजन यांच्याकडे कुठून आली? महाजन हे भाड्याच्या खोलीमध्ये राहत होते, ते एका शिक्षकाचा मुलगा आहेत, मग त्यांच्याकडे एवढी संपत्ती कुठून आली? मी सात वर्षांचा होतो तेव्हापासूनच माझ्या नावावर शंभर एकर जमीन आहे, असेही यावेळी एकनाथ खडसे यांनी म्हटले आहे.

--------------------

### आषाढी वारी सर्व विभागांच्या

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे आषाढी एकादशी वारीच्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. बैठकीला उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, माढ्याचे आमदार अभिजित पाटील, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, आध्यात्मिक आघाडीचे तुषार भोसले, यांच्यासह वित्त, नियोजन, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, मानाच्या १० दिंड्यांचे प्रमुख, प्रतिनिधी उपस्थित होते. पुण्याच्या प्रभारी विभागीय आयुक्त कविता द्विवेदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे वारीच्या तयारीची माहिती सादरीकरणातून दिली. त्यानंतर प्रमुख दिंडीचे प्रतिनिधी, विश्वस्त यांनी वारीसंबंधात सूचना, अडचणी मांडल्या. पुणे शहराच्या ठिकाणी विविध स्वागत मंडप, लाऊड स्पीकरवर बंदी असावी, प्रत्येक पालख्यांना जास्तीचा पोलीस बंदोबस्त, अरूंद रस्त्यांचे रूंदीकरण, वाखरी मॉडेल वारकरी तळ, पालखीसोबत साध्या अम्ब्युलन्ससोबत कार्डियाक अम्ब्युलन्स, दर्शन पासची संख्या, वॉटर प्रूफ टेंट, पाण्याचे टँकर, मुबलक औषध साठा, पालख्यांच्या पारंपरिक मार्गाचा विकास, फिरती शौचालये, वाखरी वारकरी तळ मॉडेल करण्याच्या सूचना मांडण्यात आल्या. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले की, वारीचे योग्य नियोजन करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे. पुणे, पिंपरी चिंचवड आयुक्तांनी पालख्यांच्या स्वागतासाठी वेगळी व्यवस्था करावी. रस्त्याच्या बाजूला मंडप टाकून स्वागत करावे, मात्र पालख्यांना विलंब होवू नये, याची दक्षता घ्यावी.

**विभागीय आयुक्तांनी समन्वयाने काम करावे**

राज्यातील विविध भागातून पालख्या पंढरपूरला येतात. नाशिक, विदर्भ, मराठवाडा याठिकाणाहून येणाऱ्या पालख्यांना पालखी मार्गात सोयीसुविधा देण्यासाठी नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती विभागीय आयुक्तांनी समन्वयांनी बैठक घेवून उपाययोजना कराव्यात. आपापल्या जिल्ह्यातून पालख्या जाताना स्थानिक प्रशासनाने रस्ते, पाणी, वीज, पोलीस बंदोबस्त, आरोग्याच्या सुविधा पुरविण्यासाठी तत्काळ बैठका घेवून नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. पोलीस महासंचालक यांनी पोलीस अधिकाऱ्यांशी योग्य समन्वय करून पालख्यांच्या बंदोबस्ताची, वाहतूक, अपघात होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. किमान महत्वाच्या मानाच्या पालख्यांना सेवा राहील याची व्यवस्था करावी. जिल्ह्याची हद्द संपते तेव्हा पोलीस बंदोबस्तावेळी दुसऱ्या जिल्ह्याने अगोदरच हजर राहून कोणतीही पालखी, दिंडी पोलिसांविना राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**वाखरी मॉडेल वारकरी तळ करणार**

सर्व संतांच्या मानाच्या पालख्या वाखरीजवळ एकत्र येतात. राज्यभरातून शेकडो पालखी सोहळे पायी पंढरीची वाट चालत असताना पालख्यांच्या स्वागतासाठी संत नामदेव महाराजांची पालखी वाखरी येथे जातात. यामुळे याठिकाणी पालख्यांच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी होते. सोलापूर जिल्हा प्रशासनाने गर्दी नियंत्रणात राहण्यासाठी योग्य नियोजन करून दक्षता घ्यावी. नामदेव महाराज यांचा असलेला ओट्याचा पुनर्विकास करावा. गर्दी लक्षात घेवून वाखरीचे विशिष्ट मॉडेल वारकरी तळ होण्यासाठी आराखडा तयार करणार असल्याची घोषणाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली.

**यावर्षीही राहणार समूह विमा**

पंढरपूर येथील वारीमध्ये दरवर्षी सुमारे १५ ते २० लाख वारकरी सहभागी होतात. पंढरपूर दिंडीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांचे आजारपण, अपघात किंवा मृत्यू झाल्यास या संदर्भात संबंधितांना दिलासा देण्यासाठी शासनाने मागील वर्षी 'विठ्ठल रखुमाई वारकरी विमा छत्र योजना' सुरु करण्याचा निर्णय घेतला. यावर्षीही वारीमध्ये सामील होणाऱ्या वारकऱ्यांना समूह विमा राहणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. मानाच्या पालखीमधील वारकऱ्यांना यापुढे दर्शन पास योग्य प्रमाणात वाढवून दिले जातील, असेही त्यांनी सांगितले.

**निर्मल वारी, हरित वारीसाठी काम वाढवून आराखडा करा**

वारी कालावधीमध्ये निर्मल वारी, हरित वारी हा उपक्रम अत्यंत महत्वाचा आहे. पालखी मार्गातील त्या-त्या जिल्ह्यातील प्रशासनाने निर्मल वारीचे अधिक काम होण्यासाठी प्रयत्नशील रहावे. शिवाय हरीत वारीने निसर्गाशी साधर्म्य राखण्यास मदत होत असल्याने याकडे गांभीर्याने पहावे. रस्त्याच्यी दुतर्फा देशी, सावली देणारी झाडे लावण्यासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

**३६ वॉटर प्रुफ मंडप**

राज्यात पावसाचा जोर राहणार असल्याने वारकऱ्यांच्या निवाऱ्यासाठी पालखी मुक्काच्या ठिकाणी ३६ वॉटर प्रुफ मंडपाची तयारी केली आहे. आवश्यकता भासल्यास आणखी वॉटर प्रुफ मंडप वाढविण्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली. वारीमध्ये प्रयागराजच्या धर्तीवर महिलांचाही विचार करण्यात आला. हिरकणी कक्षासह महिलांना स्नानासाठी वेगळी स्नानगृहांची सोय उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**वारकऱ्यांची गैरसोय टाळणार- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

यंदा राज्यात मोठ्या प्रमाणात पाऊस असल्याने विविध मानाच्या पालख्यांच्या सूचना लक्षात घेवून वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता शासन घेणार आहे, असे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. फिरते शौचालये, शुद्ध पिण्याचे पाणी, वीज, वॉटर प्रुफ टेंट, जास्तीत जास्त आरोग्यसुविधा पुरविण्यात येणार आहे. अम्ब्युलन्सबाबत कोणतीही अडचण येणार नाही, याची दक्षता आरोग्य विभाग घेईल. महिलांच्या आरोग्याबाबतही विशेष काळजी घेण्यात आली असून वारकऱ्यांना अधिक बसेस, रेल्वे उपलब्ध होण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. रस्त्यावर चिखल होणार नाही, ते सुस्थितीत राहतील याची दखल घेवू, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. यावेळी वारकरी, पालख्यासाठी विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीने केलेल्या सोयीसुविधांबाबतची माहिती सहअध्यक्ष गहिनीनाथ औसेकर यांनी दिली. यावेळी विविध पालखी संस्थानच्या वतीने योगी निरंजननाथ, चैतन्य कबीर महाराज, जालिंदर मोरे, सोमनाथ घाटेकर, अक्षय महाराज भोसले, श्री. साधू यांनी समस्या, सूचना मांडल्या.

-------------

### २० वर्षानंतर थेट गृहराज्यमंत्र्यांनीच

नाव आहे. मंगळवारी मध्यरात्री गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी बार वर धाड टाकली. या बारमध्ये तोकड्या कपड्यांमध्ये बारगर्ल अश्लिल नृत्य करत असल्याचे दिसून आले. यावेळी ४० बारगर्ल आणि ६ वेटर्सवर गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी एपीएमसी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्रात अशा पद्धतीने बेकायदेशीरपणे डान्स बार सुरु असतील तर ते तातडीने बंद करावेत. अन्यथा कडक करावाई केली जाईल अशा इशारा देखील गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिला आहे. २००५ मध्ये माजी गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी महाराष्ट्रातील डान्स बार बंद केले. आर. आर. पाटील यांनी अशाच प्रकारे डान्सबार छापेमारी केली होती. डान्सबारमुळे तरुण पिढी बर्बाद होत आहे. यामुळे कायद्याने डान्स बारवर बंदी घालण्यात आली आहे. असे असताना अनेक ठिकाणी बेकायदेशीरपणे डान्स बार सुरु आहेत.

----------------

### भारत ४४ हजार कोटींच्या १२

वेसल्स विकसित करणार आहे. त्यामुळे भारताच्या समुद्र सीमातर सुरक्षित होतीलच शिवाय अटीतटीच्या प्रसंगी नौदलाच्या युद्धनौकांचा मार्ग निर्धोक करण्याची जबाबदारी १२ माईन काऊंटर मेजर वेसल्सवर असणार आहे. समुद्री सुरुंग नष्ट करणाऱ्या १२ स्वदेशी माईन काऊंटर मेजर वेसल्स लवकरच नौदलाच्या ताफ्यात येणार आहेत. ४४, ००० कोटी रुपयांच्या खर्चातून या माईन काऊंटर वेसल्स खरेदी केल्या जाणार आहेत. या वेसल्स आता समुद्रात शत्रूने पेरलेले सुरुंग शोधून त्यांना नष्ट करण्याचे काम या नौका बजावणार आहेत. या महत्वाकांक्षी योजनेला संरक्षण मंत्री मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील डिफेन्स एक्विजिशन काऊंसिलला लवकरच मंजूरी देणार आहे.

----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. २९ मे २०२५



## पंढरपूरला देवदर्शनासाठी जाताना वडीगोद्री - जवळ कारचा अपघात; ८ भाविक जखमी

वडीगोद्री । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगरहून पंढरपूर येथे देवदर्शनासाठी जाणाऱ्या कारचा धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वडीगोद्री येथे दुभाजकाला धडकून अपघात झाला. यात कारमधील आठजण गंभीर जखमी झाले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील डोणगाव तांबे येथील तांबे कुटुंबीय पंढरपूर येथे देवदर्शनासाठी जात होते. यावेळी धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर जायकवाडी डावा कालव्याच्या कठड्याला धडकून कारचा अपघात झाला. या कारच्या पाठीमागून येणाऱ्या भरधाव वाहनाने समोर असणाऱ्या कारला ओव्हरटेक केले. त्यावेळी कारचालकाचे नियंत्रण सुटून कार धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वडीगोद्री जवळील डावा कालव्याच्या कठड्याला धडकली. या अपघातात कारमधील आठजण जखमी झाले.

या अपघातातील जखमींची नावे विष्णू हरीचंद्र तांबे (वय ५०) रा.डोणगाण तांबे ह.मु शिवाजीनगर छत्रपती संभाजीनगर, सरला विष्णू तांबे (४५), हौसाबाई हरीचंद्र तांबे (७५), मिरा रमेश लहाने (४५), कौसाबाई भिमराव जाधव (६५) रा.कडेठाण, वैभव विष्णू तांबे, चांदणी विष्णू तांबे, वैशाली विष्णू तांबे भागुबाई कल्याण तांबे या सर्व जखमींवर पाचोड व छत्रपती संभाजी नगर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# शिक्षकांचे वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव अडकले शासकिय 'दिरंगाईच्या' कचाट्यात

*** प्रतिक्षेतील काही प्रस्तावधारक शिक्षकांचे झाले निधन * जिल्हा परिषदेच्या गलथान कारभाराचा कळस**

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक संवर्गात कार्यरत असलेल्या व ज्यांच्या सेवेची १२ वर्ष आणि २४ वर्ष पूर्ण झालेली आहेत, अशा शिक्षकांना शासनाकडून वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवड वेतनश्रेणी याचा लाभ दिला जातो. अशा जिल्ह्यातील जवळपास ५०० च्यावर यासाठी पात्र असलेल्या शिक्षकांनी मागील ४ ते ५ वर्षांपूर्वीच आपले वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव हे बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात दाखल केलेले आहेत. मात्र अजूनही त्यांना त्याचा लाभ दिला गेला नसून सदरील वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव नेहमीप्रमाणे जिल्हा परिषदेच्या दिरंगाईच्या कचाट्यात अडकलेले आहेत. मागील वर्षानूवर्षे आज उद्या करत या लाभाच्या प्रतिक्षेत असलेल्या काही प्रस्तावधारक शिक्षकांचे याची प्रतिक्षा करत करत निधनही झालेले आहे. मात्र जिल्हा परिषदेच्या निगरगट्ट प्रशासनाला अजूनही याप्रश्नी पाझर न फुटल्याने नेमके काय केल्याने प्रलंबित प्रस्ताव मार्गी लागतील असा संतप्त सवाल या शिक्षक बांधवांतून उपस्थित केला जात आहे.




याबाबत अधिक माहिती अशी की, बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक संवर्गात कार्यरत असलेल्या व ज्यांच्या सेवेची १२ वर्ष आणि २४ वर्ष पूर्ण झालेली आहेत, अशा शिक्षकांना शासनाकडून वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवड वेतनश्रेणी याचा लाभ दिला जातो. अशा जिल्ह्यातील जवळपास ५०० च्यावर यासाठी पात्र असलेल्या शिक्षकांनी मागील ४ ते ५ वर्षांपूर्वीच आपले वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव हे बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात दाखल केलेले आहेत. मात्र अजूनही त्यांना त्याचा लाभ दिला गेला नसून सदरील वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव नेहमीप्रमाणे जिल्हा परिषदेच्या दिरंगाईच्या कचाट्यात अडकलेले आहेत. बीड जिल्हा परिषदेमध्ये ज्या सद्ग्रहस्थांकडे यासंबंधीचा विभाग आहे त्यांना मागील अनेक वर्षांपासून संपूर्ण जिल्ह्यातील प्रस्तावधारक शिक्षक हे वेळोवेळी जावून भेटतात व हा प्रश्न नेमका कधी मार्गी लागेल याची विचारणा करतात परंतू त्यांचे ठरलेले उत्तर एकच असते की, सदरील प्रस्ताव लवकरच मार्गी लागतील मात्र वर्षावर वर्ष असे जवळपास चार ते पाच वर्ष निघून गेलेले आहेत. मात्र अद्यापही सदरच्या वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव जिल्हा परिषद दरबारी तसेच धुळखात पडून आहेत. जिल्हा परिषदेच्या अनागोंदी कारभाराचा कहर म्हणजे या वरिष्ठ व निवड वेतनश्रेणीचे प्रस्ताव दाखल करुन आपणांस याचा लवकर लाभ भेटावा यासाठी मागील अनेक वर्षांपासून प्रतिक्षा करत असलेल्या काही शिक्षक बांधवांचे निधनही झालेले आहे. ते हे जग सोडून गेलेले आहेत मात्र अशांचे सुध्दा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या या लालफितीच्या कारभारात तसेच अडकून पडलेले आहेत. बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी आदित्य जीवने साहेब रुजू झाल्यानंतर जीवने साहेबांची अगोदरची आक्रमक व तत्पर कार्यशैली हे शिक्षक बांधव ऐकून होते. परिणामी जीवने साहेबांनी पदभार घेतल्यानंतर आपल्याला वरिष्ठ व निवड श्रेणीचे आदेश तत्परतेने व वेळेत मिळतील अशी अपेक्षा शिक्षक बांधव गृहीत धरुन होते. मात्र मागील चार ते पाच वर्षांपासून वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव एकाच ठिकाणी जैसे थे असून यामुळे अपेक्षाभंग होतांना दिसून येत आहे. यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने साहेब यांनी तात्काळ शिक्षकांचा या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेला प्रलंबित वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी प्रस्तावाचा हा प्रश्न तातडीने निकाली काढण्याची गरज असून त्यांनी तो काढावा अशी मागणी सर्व बीड जिल्ह्यातील वरिष्ठ व निवड श्रेणी प्रस्तावधारक शिक्षक बांधवांच्या वतीने होतांना दिसून येत आहे.

## नव्या उभारीने पक्ष चळवळ बळकट करूया-नितीन जेथलिया

**राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीसपदी नितीन जेथलिया**

जालना । प्रतिनिधी

परतुर तालुक्यातील तसेच मंठा येथील कोणत्याही व्यक्तीचे समस्या संदर्भात काही समस्या असल्यास निकाली काढणारे परतुर व मंठा लोकसभा मतदारसंघातील माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांचे चिरंजीव युवा चळवळीचे नेते नितीन कुमार जेथलिया यांची नुकतीच राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनीलजी तटकरे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण यांनी नुकतेच एका पत्रा द्वारे त्यांची सदर नियुक्ती जाहीर केली आहे. मुंबई येथील विशेष कार्यक्रमात त्यांना सदरील नियुक्तीपत्र देऊन त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली.यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर, माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जालना जिल्हाध्यक्ष सरकटे, बाबासाहेब गाडगे, जिल्हा परिषद सदस्य इंद्रजीत घनवट, लक्ष्मणराव शिंदे, तारीख भाई सिद्दिकी, दत्तराव पवार, दिलीपराव चव्हाण, उदय नेब साहेब,यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची विशेष उपस्थिती होती.



या निवडीबद्दल परतुर मंठा मतदारसंघासह जालना जिल्ह्यातील व राज्यातील राष्ट्रवादी युवक कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला आहे. आपली प्रतिक्रिया देताना नवनिर्वाचित प्रदेश सचिव नितीन कुमार जेथलिया यांनी म्हटले की चला नव्या जोमाने नव्या उभारीने पक्ष चळवळ बळकट करूया या नियुक्तीच्या माध्यमातून सबंध राज्यात राष्ट्रवादी युवा चळवळ नव्या उमेदीने उभारणार असल्याची ग्वाही यावेळी नितीन कुमार जेथलिया यांनी दिली. आजवर केलेल्या कार्याची पावती म्हणून ह्या पदाची जबाबदारी आपल्यावर देण्यात आली असून या पदाच्या माध्यमातून परतूर मंठा मतदारसंघासह सबंध राज्यामध्ये गाव तिथे राष्ट्रवादी युवक फळी हे अभियान आपण राबवणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली सबंध राज्यामध्ये सर्व वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आपण कार्य करणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. माजी आमदार सुरेश कुमार जिथलिया यांच्या सहवासात दांडगा राजकीय अनुभव असलेले नितीन कुमार जेथलिया हे परतुर मंठा मतदारसंघांमध्ये युवा नेते म्हणून परिचित आहेत ज्यांना जिल्ह्यातही युवा चळवळीमध्ये अग्रेसर असलेले नितीन कुमार जेथलिया यांनी या परिसरामध्ये कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण केलेली. आहे.माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश घेतला होता त्यांच्यासह नितीन कुमार जेथलिया यांनी देखील मोठ्या प्रमाणात युवकांचा फौज फाटा सोबत घेत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला होता यानिमित्ताने युवक काँग्रेसची राज्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आल्याचे कळते त्यांच्या या निवडीने मतदार संघातच नव्हे तर राज्यात राष्ट्रवादी युवक चळवळीला मोठी गती निर्माण होईल अशा प्रतिक्रिया कार्यकर्ते यांच्याकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त अंबड-चौंडी बस सेवा सुरु

अंबड । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त अंबड एसटी आगाराच्यावतीने अंबड ते चौंडी अशी थेट प्रवासी बस सुरु करण्यात आली असून या बससेवेचा शुभारंभ मोठ्या थाटामाटात करण्यात आला.

अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मस्थळ असलेल्या पावनभूमी चौंडी (जि.अहिल्यानगर) येथे नतमस्तक होण्यासाठी दूरदुरहून भक्त मोठ्या संख्येने जातात. दरम्यान त्रिशताब्दी जयंती वर्षानिमित्त पावनभूमी चौंडी या पवित्रभूमीस नतमस्तक होण्यासाठी सर्व आपल्या कुटुंबासह आवर्जून जात आहेत.अंबड शहर व तालुक्याबरोबरच घनसावंगी,



बदनापूर, परतूर, जालना, जाफराबाद, भोकरदन तालुक्यात धनगर समाज बांधव मोठ्या प्रमाणात आहे. परंतु अंबड आगारातून किंवा जालना जिल्ह्यातील इतर कुठल्याही आगारातून चौंडी येथे थेट बस जात नसल्याने या पावननगरीत नतमस्तक होण्यास जाणाऱ्या भक्तांची अत्यंत गैरसोय होत असे तसेच अन्य वाहनाने प्रवास केल्याने आर्थिक फटका व वेळेचा अपव्ययही सहन करावा लागत असे. त्यामुळे अंबड ते चौंडी अशी बससेवा अंबड आगारातून सुरू करण्यात यावी अशी मागणी सकल धनगर समाज अंबडच्यावतीने करण्यात आली होती. ज्यामुळे जिल्ह्यातील ६ तालुक्यातील प्रवाशांबरोबरच या मार्गावर असणाऱ्या वडीगोद्री, शहागड,गेवराई, बीड, पाटोदा,जामखेड भागातील प्रवाशांनाही या बसची सेवा उपलब्ध होवून संपूर्ण परिवारासह या बसने चौंडी येथे जाऊन नतमस्तक होऊन परत येणे सहज शक्य होईल असे सांगण्यात आले.सर्व समाज बांधवांची मागणी लक्षात घेवून अंबड आगाराच्यावतीने अंबड ते चौंडी अशी थेट बस सेवा सुरु करण्यात आली.आकर्षक सजवलेल्या या बसचा मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी आगार प्रमुख रणवीर कोळपे यांच्यासह बसचे वाहक व चालक यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी सकल धनगर समाज बांधवांसह अन्य मान्यवर व प्रवाशांची उपस्थिती होती.अत्यंत आकर्षक सजवलेल्या या बससोबत सेल्फी घेण्याचा मोह अनेक प्रवाशांना आवरला नाही.अंबड आगाराच्या या बस सेवेमुळे प्रवाशी वर्गातून मोठे समाधान व्यक्त होत आहे.

# अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त महिला मेळावा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन

**महिला मेळावा व रांगोळी स्पर्धेत शालेय विद्यार्थिनी व महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे - शंकर देशमुख**

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा भारतीय जनता पार्टी आणि संस्कार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने महिला मेळावा व रांगोळी स्पर्धाचे आयोजन करण्यात आलेले आहे. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार आजच्या पिढीला समजन्यासाठी भारतीय जनता पार्टी विविध कार्यक्रम आयोजित करत आहे .सदर रांगोळी स्पर्धा ही दोन गटात होणार



असून वय वर्ष पाच ते पंधरा असा मुलींचा गट असून पंधरा वर्षांपूर्वी महिलांचा दुसरा गट करण्यात येणार आहे या दोन्ही गटात सहभागी होणाऱ्या मुली व महिलांसाठी स्वतंत्रपणे बक्षीस दिले जाणार असून बीड शहरातील व जिल्ह्यातील मुली आणि माहीलानी या स्पर्धेमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे आध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे.

भारतीय जनता पार्टी आणि संस्कार भारतीयांच्या स्वस्त विद्यमान आयोजित करण्यात आलेली ही रांगोळी स्पर्धा दिनांक ३० मे रोजी सकाळी अकरा वाजता अमृत मंगल कार्यालय येथे होणार असून दुपारी दोन वाजता महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेसाठी संस्कार भारतीची सर्व टीम भारतीय जनता पार्टीला सहकार्य करत असून संस्कार भारती व भारतीय जनता पार्टीच्या सर्व कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी देखील या स्पर्धा आणि मेळाव्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शंकरराव देशमुख यांनी केले आहे.

## कर्जत जामखेडमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय होणार?

जामखेड । प्रतिनिधी

अहिल्यानगर मतदारसंघात वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यास राज्य सरकारने मंजुरी देताच हे महाविद्यालय कर्जत-जामखेड मतदारसंघात होण्यासाठी आमदार रोहित पवार यांनी फिल्डींग लावली आहे. यासाठी त्यांनी राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे.

या महिन्याच्या सुरवातीला राज्य मंत्रिमंडळाची चोंडी (ता. जामखेड) येथे बैठक झाली आणि या बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या महाविद्यालयासाठी जागेचा शोधही युद्धपातळीवर घेण्यात येत आहे. अहिल्यानगर शहराच्या आसपास अशी जागेचा शोध घेण्यात आला, परंतु पुरेशी आणि सर्व दृष्टीने योग्य अशी जागा उपलब्ध होत नाही. तसंच व्यावहारिक विचार केला तर अहिल्यानगर शहरात विळद घाटात विखे पाटील फौंडेशनचे वैद्यकीय महाविद्यालय आहे, शहरात जिल्हा सामान्य रुग्णालय आहे आणि इतरही मोठमोठी खासगी रुग्णालये आहेत.

## मस्त्योदरी शाळेमार्फत दाखला आपल्या दारी मोहीम



अंबड । प्रतिनिधी

२८ मे बुधवार रोजी विद्यार्थ्यांना विविध दाखले मुदतीत मिळावे . यासह दाखला आपल्या दारी या जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ यांच्या संकल्पनेतील अभियानास मस्त्योदरी विद्यालय, लोणार भायगाव तर्फे अभियानास सुरुवात करण्यात आली . यावेळी इयत्ता १० वीच्या (मार्च २०२५) विद्यार्थ्यांना घरोघरी जाऊन दाखले देण्यात आले.

यावेळी गावकरी गोविंद जाधव,भानुदास काळे, सुगनशेठ संचेती, नाथाभाऊ कुंडकर, गणपत कुंडकर, गणपत भागवत, मारोती कुंडकर, लक्ष्मण माने, पुरुषोत्तम जाधव, संदीप भोजने राजू भोजने, काशिनाथ जाधव, विलास बोंबले,मुख्याध्यापक केशव अटकर , महाईसेवा केंद्र संचालक दीपक टकले , रामेश्वर भोजने, दशरथ दसपुते, दिलीप पैठणे, पांडुरंग बोडखे , आदी उपस्थित होते.

# मान्सूनच्या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष सुरू

बीड । प्रतिनिधी

यंदा मान्सूनचे आगमन नेहमीपेक्षा लवकर झाले आहे आणि पावसाचे प्रमाण अधिक आहे. येणाऱ्या काळात हे प्रमाण जादा राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. या काळात आपत्कालीन परिस्थितीत मदती करिता जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आला आहे. २४ तास सुरू राहणाऱ्या या नियंत्रण कक्षाचा क्रमांक ०२४४२-२९९२९९ हार्दिक आहे.

नागरिकांना या क्रमांकावर मदतीसाठी कॉल करता येईल असे जिल्हा प्रशासना करते कळविण्यात आले आहे.

यासंदर्भात जारी प्रसिद्धी पत्रात म्हटले आहे की, जिल्हा प्रशासनामार्फत मान्सुन २०२५ पुर्व तयारी अनुषंगाने संबंधित यंत्रणांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत-

१. पूर्वतयारी (- ):

धोक्याची पूर्वसूचना देणे: हवामान खात्याच्या माहितीवरून नागरिकांना त्वरित इशारा देणे (, ध्वनी प्रणाली, ग्रामसेवक/पोलीस मार्फत).

आपत्ती व्यवस्थापन पथके तयार ठेवणे: , , स्थानिक होमगार्ड्स, आरोग्य सेवक, पोलीस आदींची पथके सज्ज ठेवणे.

सुरक्षित ठिकाणांची निवड: शाळा, पंचायत कार्यालय, मंदिरे यांसारखी सुरक्षित उंच ठिकाणे निवडून तिथे नागरिकांना हलवण्याची योजना तयार ठेवणे.

वाहतूक व्यवस्था: मुख्य रस्त्यांवर आणि पूरप्रवण भागांत वाहतूक नियंत्रित ठेवणे.

२. पूरस्थितीत तातडीची कार्यवाही

लोकांचे स्थलांतर: पूरग्रस्त भागातील नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवणे. वृद्ध, महिला, लहान मुले यांना प्राधान्य.

आपत्ती निवारण केंद्र उभारणे: अन्न, पाणी, औषधे, शौचालय व विश्रांती यांची सोय असलेली केंद्रे उभारणे.

आपत्कालीन आरोग्य सेवा: प्राथमिक उपचार केंद्र उभारणे, रुग्णवाहिका सज्ज ठेवणे. बचाव कार्य: जलद बचाव कार्यासाठी बोटींनी आणि गोताखोरांच्या साहाय्याने अडकलेल्या लोकांना बाहेर काढणे.

३. पूरानंतरची कार्यवाही (- ):

सफाई व निर्जंतुकीकरण: पाण्याचा निचरा झाल्यानंतर गावाची सफाई व रोगप्रतिकारक उपाय (फवारणी, पिण्याच्या पाण्याची तपासणी).

आरोग्य तपासणी: साथीचे रोग पसरू नयेत म्हणून मोफत आरोग्य तपासणी शिबिरे. सरकारी मदतीचे वितरण: नुकसान भरपाई, अन्नधान्य, निवारा, कपडे यांचे वितरण.

वित्तीय मदत: घरांचे नुकसान, शेतीचे नुकसान, जनावरांचे मृत्यू याबाबत नुकसान भरपाईची प्रक्रिया सुरू करणे.

४. इतर उपाययोजना:

स्थानिक लोकांशी समन्वय: सरपंच, ग्रामसेवक, युवक मंडळ, स्वयंसेवी संस्था यांच्याशी सहकार्य करून कार्यवाही करणे.

माहिती संकलन व अहवाल: नुकसानाचा अंदाज घेऊन जिल्हा प्रशासनाला अहवाल सादर करणे. आधी सर्वांसाठी शासन यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर नियंत्रण कक्ष ०२४४२-२९९२९९ स्थापन करण्यात आले असून नागरिकांनी आपत्कालीन स्थितीमध्ये संपर्क करणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

पान ६ वरून...

### धार्मिक ऐक्यासाठी समस्त

आले होते. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर बोलत होत्या.

डॉ.क्षीरसागर पुढे म्हणाल्या की, सावरकर हे भारताचे महान स्वातंत्र्यसेनानी व देशभक्त होते. त्यांनी मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला. काळ्या पाण्यासारख्या कठोर छळास तोंड दिले, पण आपली देशभक्ती आणि सेवा कधीच सोडली नाही. त्यांच्या विचारांना जनमानसात पोहोचवण्यासाठी मी स्वतः प्रयत्नशील राहणार आहे. सावरकर पुतळा परिसरात सुसज्ज ग्रंथालय आणि भव्य भगवा ध्वज उभारण्याचा मानसही त्यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी प्रा.चंद्रकांत मुळे, डॉ.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य सलीम जहाँगीर, भाजपाचे बीड शहराध्यक्ष अशोक लोढा, शिवसेनेचे नितीन धांडे, गिरीश देशपांडे, डॉ.पी.के. कुलकर्णी, ॲड.उद्धव रासकर, पत्रकार प्रमोद कुलकर्णी आदी मान्यवरांनी सावरकरांच्या कार्याचा गौरव करत भाषणे केली. प्रास्ताविक डॉ. अजिंक्य पांडव यांनी केले. आभार महेश वाघमारे यांनी मानले. कार्यक्रमात उपस्थितांनी सावरकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ॲड.मिलिंद वाघिरकर, माजी प्राचार्य विजेंद्र चौधरी, डॉ. गणेश आडगांवकर, ॲड.प्रशांत देशपांडे, ॲड.अमित हसेगावकर, ॲड.जितेंद्र पांडव, संतोष चिंचोलकर, त्रिंबक देशपांडे, डॉ.मनोज पोहणेरकर, संतोष पारगावकर, डॉ. स्वप्नील उन्हाळे, वल्लभ गोडबोले, दीपक रुपदे, ॲड.आनंद पाटील, डॉ.राजेश भुसारी, संदीप खडकिक्कर, विजय कोटुळे, गंगाधरराव देशमुख, राम कुलकर्णी, मिलिंद शिवणिकर, डॉ.विनोद मुळे, एकनाथ टेपाले, हेमंत जोशी, राहुल भालेराव, ॲड. नरेंद्र जवळेकर, मुकुंद कुलकर्णी, अभिजित वैद्य, प्रसाद अंदुरकर, सुनील देशमुख, संजय डोळे, प्रकाश गोरकर, डॉ. छत्रपती वैरागर, नरेंद्र देशपांडे, रत्नाकर कुलकर्णी, विनायक कुलकर्णी, प्रकाश चैतन्य, वैभव देशमुख, सुनील खजानदार, संतोष जोशी आदी सावरकरप्रेमी नागरिक उपस्थित होते.

### अधिकारी व पदाधिकारी

जन्मोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रसिद्ध वक्ते महेश पिंगळे,ॲड.दत्तात्रय काजगुंडे,माऊली तात्या गडदे, गोविंद शिंदे,महेश बिट्टे,संदीप काजगुंडे,रंजित राठोड, गणेश पिंगळे, विष्णू शिंदे, संतोष काजगुंडे, आकाश शिंदे, उत्तम तरकसे, अंगद पिंगळे, विनायक गडदे, यशवंत धायगुडे, रमेश काजगुंडे, अनंत खडके, पांडुरंग काजगुंडे, बाबुराव देवकते,संतोष झारगड,प्रकाश काजगुंडे यांनी प्रयत्न केले.

# मदतकार्याला प्राधान्य द्या, नुकसानीचे तातडीने पंचनामे करा, अजित पवारांच्या प्रशासनाला सूचना

राज्याच्या विविध भागात मुसळधार पाऊस सुरु आहे. अनेक भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. या पार्श्वभूमीवर राज्य व जिल्हा यंत्रणांनी संपर्कात राहून समन्वयानं नागरिकांच्या बचाव व मदतकार्याला प्राधान्य द्यावं, अशा सूचना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. अजित पवार यांच्याकडून बारामती, इंदापूर, पुणे जिल्ह्यासह मुसळधार पाऊस असलेल्या अन्य जिल्ह्यांतील परिस्थितीचा आढावा घेतला.

मुसळधार पाऊस होत असलेल्या भागातील नागरिकांनी सतर्क, सुरक्षित राहून प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. शेती, पिके, पशुधन, घरांच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे अजित पवार यांचे प्रशासनाला निर्देश दिले आहेत. मुसळधार पाऊसग्रस्त नागरिकांना मदत आणि बचावकार्य करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी कर्तव्य बजावताना स्वत:चीही काळजी घ्यावी असे अजित पवार म्हणाले. राष्ट्रवादीच्या लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात थांबून नागरिकांना मदत करावी, अशा सूचना अजित पवारांनी कार्यकर्त्यांना दिल्या. अनेक जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारीमान्सून मुंबईसह महाराष्ट्रात दाखल



झाला असून हवामान खात्याने मुंबई, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी उद्या रेड अलर्ट आहे. पालघरसाठी यलो अलर्ट आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूरच्या घाट परिसरात पावसाचा जोर आणखी काही दिवस कायम राहणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा यंत्रणांनी सतर्क राहून नागरिकांची सुरक्षितता, बचाव व मदतकार्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. त्यासाठीच्या उपाययोजना तात्काळ राबवाव्यात. मुसळधार पावसाची शक्यता असलेल्या भागातील नागरिकांनी सावध रहावे. सुरक्षितस्थळी आसरा घ्यावा. स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात राहून त्यांच्या सूचनांचे पालन करुन सहकार्य करावे,'' असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. अजित पवारांनी दिली बारामती, इंदापूर तालुक्यांसह पुणे जिल्ह्यातील गावांना भेट

राज्याच्या अनेक जिल्ह्यात सुरु असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर काल मध्यरात्रीच बारामती येथे दाखल झालेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहाटेपासूनच बारामती, इंदापूर तालुक्यांसह पुणे जिल्ह्यातील गावांना भेट देऊन दिवसभर परिस्थितीची पाहणी केली. यावेळी राज्याचे अल्पसंख्याक विकास तथा क्रीडा व युवककल्याण मंत्री दत्तामामा भरणे, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक पृथ्वीराज जाचक, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, संबंधित गावांचे सरपंच, स्थानिक संस्था, संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शासनाचे संबंधित अधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते.शेतीचे, पिकांचे, पशुधनाचे, घरांच्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याचे निर्देश

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे ग्रामीण भागातील गावांचा दौरा करत असतानाच, मंत्रालयातील राज्यस्तरीय आपत्ती नियंत्रण व व्यवस्थापन केंद्राकडूनही अन्य जिल्ह्यातील पाऊस, धरणांची स्थिती, स्थानिक परिस्थितीचा आढावा घेतला. मुसळधार पाऊस होत असलेल्या जिल्ह्यांच्या जिल्ह्याधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे चर्चा करुन परिस्थितीची, मदतकार्याची माहिती घेतली. शेतीचे, पिकांचे, पशुधनाचे, घरांच्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याचे निर्देश त्यांनी दिले. राज्य आणि जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी सतर्क रहावे, परस्परांच्या संपर्कात राहून समन्वयाने, सहकार्याने बचाव, मदतकार्य तात्काळ राबवावे, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६० : चार्ल्स दुसर्याची इंग्लंडच्या राजेपदी पुनर्स्थापना.
१७२७ : पीटर (दुसरा) रशियाचा झार बनला.
१८४८ : विस्कॉन्सिन अमेरिकेचे ३० वे राज्य झाले.
१९१४ : ओशियन लाइनर आर.एम.एस. इंप्रेस ऑफ आयर्लंड जहाज बुडून त्यात १९९२ लोक ठार झाले.
१९१९ : अल्बर्ट आइनस्टाइन यांच्या सामान्य सापेक्षता सिद्धांताची चाचणी घेण्यात आली.
१९५३ : उत्तुंग अशा एव्हरेस्ट शिखरावर शेर्पा तेनसिंग याने ब्रिटिश गिर्यारोहक एडमंड हिलरी बरोबर चढाई करुन पहिले पाउउल ठेवले.
१९८५ : पाय नसलेल्या स्टीव फोन्योने व्हिक्टोरिया, ब्रिटिश कोलंबिया येथे मॅरेथॉन शर्यत पूर्ण केली. ४२ कि.मी. अंतर पार करण्यास फॉन्योला चार महिने लागले.
१९९९ : स्पेस शटल डिस्कव्हरी पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाला जोडले गेले.
२००७ : जपान देशाच्या महिला रियो मोरी यांनी विश्वसुंदरी चा किताब पटकाविला.
२००८ : भारतीय जनता पक्षाचे नेता वी. एस. येदुरप्पा यांनी कर्नाटक राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.
२०१० : भारताच्या तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी हेनान प्रांतातील लुओयांग येथे पहिल्या शतकातील प्राचीन श्वेताश्वा व्हाईट हॉर्स मंदिर संकुलात भारतीय शैलीतील बौद्ध मंदिराचे उद्घाटन केले.
२०१९ : ट्रांसजेंडर हे मानसोपचार आजाराच्या यादीतून जागतिक आरोग्य संघटनेने काढून टाकले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८६५ : कलकत्ता शहरावर आधारित मासिक पुस्तिका मॉडर्न रिव्ह्यूचे संस्थापक व संपादक तसचं हिंदू महासभेचे नेता, स्वातंत्र्य सेनानी रामानंद चटर्जी यांचा जन्मदिन.
१९०५ : हिराबाई बडोदेकर, किराणा घराण्याच्या गायिका.
१९०६ : भारतीय-इंग्लिश लेखक टी. एच. व्हाईट यांचा जन्म. (मृत्यू: १७ जानेवारी १९६४)
१९०६ : साली पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय पत्रकार, लेखक आणि स्वातंत्र्यसैनिक कन्हैयालाल प्रभाकर मिश्रा यांचा जन्मदिन.
१९१४ : एव्हरेस्टवीर शेर्पा तेनसिंग नोर्गे यांचा जन्म. (मृत्यू: ९ मे १९८६)
१९१७ : अमेरिकेचे लोकप्रिय अध्यक्ष जॉन केनेडी यांचा जन्म.
१९२९ : ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ पीटर हिग्ज यांचा जन्म.
१९४७ : शोर्य चक्र पुरस्कार सन्मानित भारतीय वायुसेना दलाचे माजी वायुसेना दल प्रमुख एअर चीफ मार्शल फली होमी मेजर यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८१४ : नेपोलियन बोनापार्ट यांची पहिली पत्नी जोसेफिन डी बीअर्नार्नास यांचे निधन. (जन्म: २३ जून १७६३)
१८२९ : विद्युत पृथक्करणाद्वारे सोडिअम आणि पोटॅशिअम ही मूलद्रव्ये प्रथमच वेगळी करणारे इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ सर हंफ्रे डेव्ही यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १७७८)
१८९२ : बहाई पंथाचे संस्थापक बहाउल्ला यांचे निधन. (जन्म: १२ नोव्हेंबर १८१७ तेहरान, इराण)
१९३३ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, पत्रकार आणि संघटन कर्ता लोकराम नयनराम शर्मा यांचे निधन.
१९५४ : व्हिक्टोरिया क्रॉस पुरस्कार प्राप्त ब्रिटीश सैन्य दलाचे थोर सैनिक फ्रेडरिक विल्यम हेजेस यांचे निधन.
१९७१ : प्रख्यात भारतीय चित्रपट अभिनेते पृथ्वीराज कपूर यांचे निधन.
१९७२ : पृथ्वीराज कपूर, हिंदी चित्रपटअभिनेता. (जन्म: ३ नोव्हेंबर १९०१)
१९७७ : भाषाशास्त्रज्ञ सुनीतिकुमार चटर्जी यांचे निधन (भाषाशास्त्रज्ञ, साहित्य व संस्कृतीचे अध्यापक) (जन्म: २६ नोव्हेंबर १८९०)
१९८७ : चौधरी चरण सिंग, लोकदलाचे संस्थापक, भारताचे ५ वे पंतप्रधान. (जन्म: २३ डिसेंबर १९०२)
२००७ : महाराष्ट्र राज्य लता मंगेशकर पुरस्कार विजेते प्रसिद्ध भारतीय हिंदी व मराठी चित्रपट संगीतकार स्नेहल भटकर यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९१९)
२०१० : समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक ग. प्र. प्रधान यांचे निधन. (जन्म: २६ ऑगस्ट १९२२)
२०२० : अजित जोगी (छत्तीसगढचे पहिले मुख्यमंत्री).

# केळीवरील 'काळी बोंडी कूज' रोगाचे वेळीच करा नियंत्रण!

केळी पिकावरील जळका चिरूट ज्याला आपण काळी बोंडी कूज म्हणून सुद्धा ओळखतो हा रोग तीन ते चार वर्षांपूर्वी कमी घातक रोग म्हणून ओळखला जायचा. परंतु काही काळापासून हा एक महत्त्वाचा रोग म्हणून उदयास येत आहे ज्याचे मुख्य कारण म्हणजे वातावरणातील अति आर्द्रता. हा रोग प्रामुख्याने ट्रॅचिस्फेरा फ्रुक्टिजेना या बुरशीमुळे होतो आणि काही वेळा व्हर्टिसिलियम थियोब्रोमामुळे देखील होतो. हा रोग वारा किंवा पावसामुळे पसरतो. पावसाळ्यात केळीच्या फुलांच्या अवस्थेत निरोगी उतींवर बुरशीचा हल्ला होतो. ते फुला द्वारे केळीला संक्रमित करते. तेथून पुढे ते फळांच्या टोकापर्यंत पसरते आणि कोरड्या कुजेला कारणीभूत ठरते जे राखेसारखे दिसते आणि सिगारसारखे दिसते, ज्यामुळे रोगाला सिगार एंड रॉट असे नाव दिले जाते. स्टोरेजमध्ये किंवा वाहतुकी दरम्यान या रोगाचा प्रसार संपूर्ण फळांवर होतो


रोगाची लक्षणे : हा रोग फळांच्या टोकांवर येत असून टोके कोरड्या, तपकिरी ते काळी कुजल्यासारखी दिसतात. बुरशीची वाढ प्रत्यक्षात फुलांच्या अवस्थेपासून सुरू होते आणि फळांच्या परिपक्वतापूर्वी किंवा त्यापूर्वी दिसून येते. प्रभावित भाग तपकिरी बुरशीच्या वाढीने झाकले जातात. जे स्कॅबच्या जळलेल्या टोकावर राखेसारखे दिसतात. फळांचा आकार असामान्य दिसतो, त्यांच्या पृष्ठभागावर साचा दिसून येतो आणि त्वचेवर जखम स्पष्टपणे दिसतात.

रोगाचे जैविक नियंत्रण : या रोगास कारणीभूत असलेल्या बुरशीच्या नियंत्रणासाठी बेकिंग सोडावर आधारित फवारणी केली जाऊ शकते. ही फवारणी करण्यासाठी, ५० ग्रॅम बेकिंग सोडा पाण्यात विरघळवून २५ मिली द्रव साबण प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार केले जाते. संसर्ग टाळण्यासाठी, हे मिश्रण संक्रमित फांद्या आणि जवळच्या फांद्यावर फवारावे. हे केळीच्या बोटांच्या पृष्ठभागाची पीएच पातळी वाढवते आणि बुरशीच्या वाढीस प्रतिबंध करते.

रासायनिक नियंत्रण : शक्य असल्यास जैविक उपचारासह प्रतिबंधात्मक उपायांसह एकात्मिक दृष्टिकोनाचा नेहमी विचार करा. हा रोग सहसा किरकोळ महत्त्वाचा असतो आणि क्वचितच रासायनिक नियंत्रणाची आवश्यकता असते. मात्र गेल्या तीन वर्षात या आजाराच्या तीव्रतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे कारण अतिवृष्टीमुळे वातावरणात भरपूर ओलावा निर्माण झाला आहे, जो या आजाराच्या प्रसारासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे रासायनिक नियंत्रणासाठी

केळीच्या बाधित घडावर एकदा मॅन्कोझेब, ट्रायओफेनेट मिथाइल किंवा मेटालॅक्सिल १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि नंतर प्लास्टिकने झाकून टाकावे. कॉपर ऑक्सिक्लोराईड स्प्रे सारखी कॉपर बुरशीनाशके देखील प्रभावी ठरू शकतात.

# एका बाजूला दुष्काळाच्या झळा, तर दुसऱ्या बाजूला चाऱ्याच्या दराचे संकट



सध्या राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठं उष्णतेच्या झळा लागत आहेत, तर कुठं अवकाळी पावसाचा जोर पाहायला मिळत आहे. राज्यातील बहुतांश भागात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढं गेलाय. त्यामुळं नागरिकांना त्रासाला सामोर जावं लागत आहे. अशातच दुसऱ्या बाजूला अनेक ठिकाणी पाणीटंचाईचं संकट निर्माण झालंय. विशेषत: मराठवाड्यात दुष्काळाच्य झळा अधिक तीव्र होताना दिसत आहेत. दुसरीकडं पाणीटंचाईमुळं जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झालाय. अशातच जनावरांच्या चाऱ्याचे दर देखील वाढताना दिसत आहेत. त्यामुळं पशुपालक चिंतेत आहेत.

चाऱ्याचे भाव वाढल्याने पशुपालक अडचणीत

मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील पशुपालक चिंतेत आहेत. पाणी टंचाईच्या झळांसह आता चारा भाववाढीचे संकट त्यांच्यासमोर आहे. चाऱ्याचे भाव वाढल्याने पशुपालक अडचणीत आले आहेत. मराठवाड्यात दुष्काळाच्या झळा तीव्र होताना दिसत आहेत एकीकडे पाणी टंचाई तर दुसरीकडे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न ही दिवसेंदिवस बिकट होत चालल्याने भाववाढीच्या संकटाला पशुपालकांना सामोरे जावे लागत आहे. कडबा, हिरवा चारा तसेच सरकी पेंडीचे भावही वाढले आहेत. त्यामुळं जनावरं जगवायची कशी? असा प्रश्न पशुपालकांसमोर पडलाय.

कोणत्या चाऱ्यात कीती झाली वाढ? :

हिरवा चारा : पहिल्यांदा हिरव्या चाऱ्याच्या १०० पेंड्या १५०० ते १६०० रुपयांना येत होत्या. सध्या यामध्ये मोठी वाढ झालीय. आता हिरव्या चाऱ्याच्या १०० पेंड्या १९०० ते २००० रुपयांना येत आहेत. यामध्ये सध्या ३०० ते ४०० रुपयांची वाढ झाली आहे.

कडबा : कडब्याच्या दरातही वाढ झालीय. पहिल्यांदा कडब्याच्या १०० पेंड्या १६०० ते १७०० रुपयांना येत होत्या. आता यामध्ये वाढ झालीय. आता कडब्याच्या १०० पेंड्या २००० ते २१०० रुपयांना मिळतात. कडब्यातही ३०० ते ४०० रुपयांची वाढ झालीय.

विहीरी आणि बोअरवेलची पाणी पातळी गेली खाली

मागील वर्षी पावसाचं प्रमाण खूप कमी राहीलं होतं. त्यामुळं धरण असेल तलाव असतील यामध्ये पाण्याचा साठा हा कमी प्रमाणात राहिला होता.

तसेच उष्णतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळं विहीरी आणि बोअरवेलची पाणी पातळी देखील खाली गेलीय. तर काही ठिकाणी विहीरी आटल्या आहेत तर बोअरवेल बंद पडले आहेत. त्यामुळं शेतकरी चिंतेत आहे. पाणी नसल्यामुळं जनावरांसह त्यांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण झालाय. जनावरे कशी जगवावीत असा सवाल शेतकरी करताना दिसत आहेत.

# भरघोस नफ्यासाठी मधमाशीपालन फायदेशीर

देशात मधमाशीपालन झपाट्याने वाढत आहे. तज्ज्ञ याला फायदेशीर काम म्हणतात. मधमाशीपालन करून मोठ्या प्रमाणात शेतकरी नफा कमावत आहेत. सरकार शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे काम करत आहे. केंद्र सरकार मधुमक्षिका पालनासाठी ८० टक्के अनुदान देते. त्याचबरोबर राज्य सरकारही या कामासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देते. मधमाश्यांच्या पेट्या, मध उत्खनन उपकरणे आणि प्रक्रिया यांसह मध वसाहतींसाठी सामान्य श्रेणीतील शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदान दिले जाते. तसेच एससी-एसटी प्रवर्गातील शेतकऱ्यांना ९० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जात आहे. तज्ज्ञांच्या मते, १० खोक्यांमधून मधमाशी पालन सुरू करता येते. त्याची किंमत सुमारे ४० हजार रुपये आहे. मधमाशांची संख्याही दरवर्षी वाढते. मधमाश्या जितक्या जास्त तितके जास्त मध उत्पादन. तसेच नफाही त्यानुसार अनेक पटींनी वाढतो.



असे करतात संगोपण : मधमाश्या ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना सेंद्रिय मेणाची (पेटी) व्यवस्था करावी लागते. यामध्ये ५० हजार ते ६० हजार मधमाश्या एकत्र ठेवल्या जातात. या मधमाशा सुमारे एक क्विंटल मध तयार करतात. बाजारात शुद्ध मधाची किंमत ७०० ते १०० रुपये प्रति किलो आहे. जर तुम्ही प्रति पेटी १००० किलो मधाचे उत्पादन केले तर तुम्ही दरमहा लाखो रुपयांची बचत करू शकता.

मधमाशी पालनाचे फायदे : फुलांचा रस/ पराग यांचा सदुपयोग होतो. आर्थिक प्राप्ती मिळते व रोजगाराचा प्रश्न सुटतो. शुद्ध मधाचे उत्पादन, मेणाचे उत्पादन व इतर आधारीत वस्तुंचे उत्पादन होते. कोणत्याही इतर जास्तीच्या खताशिवाय, बियांशिवाय मधमाशी पालन हे शेताच्या बांधावर/शेतालगत केल्याने त्याचा फायदा शेतीला होतो. शेतीतील भाजी, फुलांच्या उत्पादनात सव्वा ते दिड पटींनी वाढ होते.कारण मधमाशा ह्या परागीकरणाचे काम उत्तमरित्या करतात. मधाच्या सेवनाने मानवाचे आरोग्य उत्तम राहते. ते एका प्राकृतिक औषधाचे काम करते. मधाचे सेवनाने अनेक रोग होत नाहीत. रक्तदाब, लठ्ठपणा आदी रोगांमध्ये फायदा होतो. मधमाशी पालनास फारच कमी खर्च लागतो व तुलनेने वेळपण कमी लागतो. त्यास जागाही फारच कमी लागते. कमी प्रतवारी असणाऱ्या जमिनीच्या शेतात मधमाशी पालनाचे फायदे आहेत. ती जमिन वापरात येते. पर्यावरणावर मधमाशी पालनाचा सकारात्मक प्रभाव पडतो. परागीकरणासाठी मधमाश्या फारच महत्त्वाची भूमिका पार पाडतात, त्यामुळे फळांचे उत्पादनही वाढते.मधमाशी पालनासाठी लागणारे साहित्य : पोळे ही एक साधी लांब पेटी असते आणि तिच्या वरील भागावर अनेक पट्ट्या असतात. या पेटीचा अंदाजे आकार १०० सेंमी लांब, ४५ सेंमी रुंद आणि २४ सेंमी उंच असा असावा. ही पेटी २ सेंमी जाड असावी आणि पोळे १ सेंमी रुंदीच्या प्रवेश छिद्रांसहित एकत्र चिटकवलेले आणि स्क्रूने घट्ट केलेले असावे. वरील पट्ट्या पोळ्याच्या रुंदीइतक्याच लांबीच्या असाव्यात जेणेकरून त्या आडव्या बरोबर बसतील आणि त्यांची जाडी १.५ सेंमी असावी म्हणजे एक वजनदार मधाचे पोळे पेलण्यासाठी त्या पुरेशा होतील. प्रत्येक स्वतंत्र वरील पट्टीला एकेक पोळे तयार करण्यासाठी मधमाशांना आवश्यक नैसर्गिक जागा मिळण्याकरता ३.३ सेंमीची रुंदी ठेवणे गरजेचे आहे. धुराडं हे दुसरं महत्त्वाचं साधन आहे. ते लहान पत्र्याच्या डब्यापासून तयार करता येतं. मधमाशा आपल्याला चावू नयेत आणि त्यांना नियंत्रित करता येण्यासाठी त्याचा वापर केला जातो. कापड - मधमाशा पालन क्षेत्रात काम करताना माशांच्या दंशापासून आपले डोळे आणि नाकाचा बचाव करण्यासाठी. सुरी वरील पट्ट्या सैल करण्यासाठी आणि मधाची पोळी कापण्यासाठी. पिस मधमाशांना पोळ्यापासून दूर करण्यासाठी. राणीमाशीविलगक काड्याचीपेटी.मधुमाशांच्या प्रजाती : दगडी माशी, अपीस डोरसाटा या माशा उत्तम प्रकारे मध गोळा करतात आणि त्यांच्या प्रत्येक वसाहतीमागे सरासरी मध उत्पादन ५०-८० किलो असते. लहान माशी अपीस फ्लोरिआ या माशा कमी मध गोळा करतात आणि त्यांच्या प्रत्येक वसाहतीमागे अंदाजे २००-९०० ग्रॅम मध मिळतो. भारतीय मधमाशी अपीस सेराना इंडीका या मधमाशांद्वारे होणारे मध उत्पादन दर वर्षी प्रति वसाहत ६-८ किलो असते. युरोपिअन मधमाशी इटालिअन मधमाशी अपीस मेल्लीफेरा यांच दर वसाहतीमागे सरासरी मध उत्पादन २५-४० किलो असते. डंखरहित मधमाशी त्रिगोना इरीडीपेन्नीस ही वर उल्लेख केलेल्या प्रजातींच्या शिवाय, केरळमध्ये आणखी एक प्रजाती अस्तित्वात आहे तिला डंखरहित मधमाशी म्हणतात. त्या खऱ्या अर्थाने डंखरहित नसतात, परंतु त्यांचा डंख पुरेसा विकसित झालेला नसतो. त्या परागीकरण चांगल्या प्रकारे करतात. त्यांच्याद्वारे दर वर्षी ३००-४०० ग्रॅम मध उत्पादन मिळते. दरम्यान, नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंतमध्ये ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीतर्फे मधमाशीवर आधारित पर्यटन म्हणजेच 'ॲपि-टुरिझम'चे देशातील नाविन्यपूर्ण व पहिलेच केंद्र स्थापन करण्यात आले असून त्याला पर्यटकांचाही दिवसेंदिवस चांगला प्रतिसाद मिळतो आहे.

## थोडक्यात



### पाटोदा शहरातील पुलावरील खड्ड्यांमुळे घाण पाणी अंगावर बंदोबस्त करावा

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा शहरातून जाणाऱ्या पैठण पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावरील शहरातील असणाऱ्या पुलावर खड्डे पडल्यामुळे पावसाळ्यात त्यात पाणी साचले असून येणाऱ्या जाणाऱ्या पादचारी वर्गाच्या अंगावर घाणपाणी उडत असून याचा त्रास सहन करावा लागत आहे तरी याकडे लक्ष देऊन तात्काळ हे खड्डे बुजविण्याची मागणी होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की पाटोदा शहरातून पैठण पंढरपूर हा राष्ट्रीय महामार्ग जात असून मात्र या राष्ट्रीय महामार्गाचे काम ठिकठिकाणी अर्धवट पडले असून याचा त्रास मात्र नागरिकांना होत असून शहरातील असणाऱ्या पुलावर जागोजागी मोठे खड्डे पडल्यामुळे या खड्ड्यात पावसाळ्यात पाणी साचत असून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांमधून अंगावर हे घाण पाणी उडत असून तरी या खड्ड्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे

### १० पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या तर नव्याने २७ येणार

पाटोदा। प्रतिनिधी

पाटोदा पोलीस स्टेशन अंतर्गत प्रशासकीय विनंतीनुसार पाटोदा पोलीस स्टेशन मधून दहा पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या इतरत्र झाले आहेत तर बाहेर पोलीस स्टेशन मधून पाटोदा येथे २७ पोलीस कर्मचारी यांच्या बदल्या झाल्या असून लवकरच हे कामावर रुजू होणार असल्याचे म्हटले आहे याबाबत अधिक माहिती अशी की पाटोदा पोलीस स्टेशन मधून प्रशासकीय व विनंतीनुसार दहा पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या इतरत्र झाले आहेत तर पाटोदा पोलीस स्टेशन मध्ये २७ पोलीस कर्मचारी हे नव्याने आले आहेत ते याप्रमाणे बाहेरच्या पोलीस स्टेशन मधून पाटोदा येथे बदली होऊन आलेले कर्मचारी टिपरसे – एलसीबीहुन.खेडकर नागरगोजे – नेकनुर पवार – नेकनुर सारूक – वाहतूक. आतकरे – बीड शहर काळे – आष्टी. तांदळे – बीड शहर शेख – पेठ बीड. एसपी आफिस भिसे – आरसीपी. साळवे – सोनवणे–एसडीपीओ बी. हजारे – एलसीबी. रेडेकर – बीड शहर. थोरात – गेवराई सोनवणे – एचओ. वंजारे – एचओ. तांदळे – नेकनुर. भोसले – नेकनुर. इनामदार – पेठ बीड. खंडागळे – पेठ बीड . घोडके– शिवाजीनगर. पवळ – चकलांबा.वायभट–सायबर सेल.जोगदंड–शिवाजीनगर. येळे – आष्टी हे आले तर पाटोदा पोलीस स्टेशन मधून इतरत्र बदली झालेले कांबळे – अंभोरा. मिसाळ – आष्टी . तागड – आष्टी. खोडके – बीड शहर. राऊत – पेठ बीड. सानप – पेठ बीड . क्षीरसागर – आष्टी.सोळंके–आंबेजोगाई ग्रा. राख – पेठ बीड. गंधकवाड– केज अशा बदल्या झाल्या आहेत.

### मुहम्मद उमर सीबीएसई दहावी परिक्षेत ९५.४% विशेष प्राविण्याने उत्तीर्ण

बीड । प्रतिनिधी

सीबीएसई दहावी बोर्ड परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यात बीड शहरातील नामांकित अपेक्स बालरुग्णालयाचे डॉ. मुहम्मद इज़हार जावीद आणि डॉ. नाज़ीया मुहम्मद इज़हार जावीद (त्वचा रोग तज्ञ) यांचा गुणवंत मुलगा मुहम्मद उमर याने सीबीएसई दहावी परिक्षेत ९५.४% गुण घेत विशेष प्राविण्याने घवघवीत यश संपादन केले आहे. मुहम्मद उमर याने पुढील जीवनात वडिलांप्रमाणेच डॉक्टर होऊन बालरोग तज्ञ होण्याचा मानस व्यक्त केला आहे.मुहम्मद उमरच्या अलौकिक यशाबद्दल त्याचे आजोबा ऑडिटर मुहम्मद अब्दुल गफ्फार, मोठे काका अपेक्स मेडीकलचे मालक अब्दुल खालेक, लहान काका डॉ. मुहम्मद अब्दुल माज़ीद (मेंदू विकार शल्यचिकित्सक) मॅक्स कॅयर हॉस्पिटल, अहेमदनगर व लहान काकी, डॉ. मरियम मुहम्मद अब्दुल माजीद (स्त्री रोग तज्ञ) मॅक्स कॅयर हास्पिटल, अहेमदनगर आणि (नेत्र तज्ञ) अज़हर जमील व (इंजिनियर) शाहेद लतीफ आणि पोद्दार इन्टरनॅशनल स्कुल बीड चे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, नातेवाईक, मित्र परिवाराकडून त्याचे अभिनंदन करून भरभरून शुभेच्छा दिल्या जात आहे.

# जिल्ह्यातील शिक्षकांचे वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव अडकले दिरंगाईच्या कचाट्यात

## प्रतिक्षेतील काही प्रस्तावधारक शिक्षकांचे झाले निधन

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक संवर्गात कार्यरत असलेल्या व ज्यांच्या सेवेची १२ वर्ष आणि २४ वर्ष पूर्ण झालेली आहेत, अशा शिक्षकांना शासनाकडून वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवड वेतनश्रेणी याचा लाभ दिला जातो. अशा जिल्ह्यातील जवळपास ५०० च्यावर यासाठी पात्र असलेल्या शिक्षकांनी मागील ४ ते ५ वर्षांपूर्वीच आपले वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव हे बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात दाखल केलेले आहेत. मात्र अजूनही त्यांना त्याचा लाभ दिला गेला नसून सदरील वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव नेहमीप्रमाणे जिल्हा परिषदेच्या दिरंगाईच्या कचाट्यात अडकलेले आहेत. मागील वर्षानुवर्षे आज उद्या करत या लाभाच्या प्रतिक्षेत असलेल्या काही प्रस्तावधारक शिक्षकांचे याची प्रतिक्षा करत करत निधनही झालेले आहे. मात्र जिल्हा परिषदेच्या निगरगट्ट प्रशासनाला अजूनही याप्रश्नी पाझर न फुटल्याने नेमके काय केल्याने प्रलंबित प्रस्ताव मार्गी लागतील असा संतप्त सवाल या शिक्षक बांधवांतून उपस्थित केला जात आहे.




बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक संवर्गात कार्यरत असलेल्या व ज्यांच्या सेवेची १२ वर्ष आणि २४ वर्ष पूर्ण झालेली आहेत, अशा शिक्षकांना शासनाकडून वरिष्ठ वेतनश्रेणी आणि निवड वेतनश्रेणी याचा लाभ दिला जातो. अशा जिल्ह्यातील जवळपास ५०० च्यावर यासाठी पात्र असलेल्या शिक्षकांनी मागील ४ ते ५ वर्षांपूर्वीच आपले वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव हे बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात दाखल केलेले आहेत. मात्र अजूनही त्यांना त्याचा लाभ दिला गेला नसून सदरील वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव नेहमीप्रमाणे जिल्हा परिषदेच्या दिरंगाईच्या कचाट्यात अडकलेले आहेत. बीड जिल्हा परिषदेमध्ये ज्या सद्ग्रहस्थांकडे यासंबंधीचा विभाग आहे त्यांना मागील अनेक वर्षांपासून संपूर्ण जिल्ह्यातील प्रस्तावधारक शिक्षक हे वेळोवेळी जावून भेटतात व हा प्रश्न नेमका कधी मार्गी लागेल याची विचारणा करतात परंतू त्यांचे ठरलेले उत्तर एकच असते की, सदरील प्रस्ताव लवकरच मार्गी लागतील मात्र वर्षावर वर्ष असे जवळपास चार ते पाच वर्ष निघून गेलेले आहेत. मात्र अद्यापही सदरच्या वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव जिल्हा परिषद दरबारी तसेच धुळखात पडून आहेत. जिल्हा परिषदेच्या अनागोंदी कारभाराचा कहर म्हणजे या वरिष्ठ व निवड वेतनश्रेणीचे प्रस्ताव दाखल करुन आपणांस याचा लवकर लाभ भेटावा यासाठी मागील अनेक वर्षांपासून प्रतिक्षा करत असलेल्या काही शिक्षक बांधवांचे निधनही झालेले आहे. ते हे जग सोडून गेलेले आहेत मात्र अशांचे सुध्दा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या या लालफितीच्या कारभारात तसेच अडकून पडलेले आहेत. बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी आदित्य जीवने साहेब रुजू झाल्यानंतर जीवने साहेबांची अगोदरची आक्रमक व तत्पर कार्यशैली हे शिक्षक बांधव ऐकून होते.

परिणामी जीवने साहेबांनी पदभार घेतल्यानंतर आपल्याला वरिष्ठ व निवड श्रेणीचे आदेश तत्परतेने व वेळेत मिळतील अशी अपेक्षा शिक्षक बांधव गृहीत धरुन होते. मात्र मागील चार ते पाच वर्षांपासून वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव एकाच ठिकाणी जैसे थे असून यामुळे अपेक्षाभंग होतांना दिसून येत आहे. यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने साहेब यांनी तात्काळ शिक्षकांचा या जिव्हाळ्याचा प्रश्न असलेला प्रलंबित वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी प्रस्तावाचा हा प्रश्न तातडीने निकाली काढण्याची गरज असून त्यांनी तो काढावा अशी मागणी सर्व बीड जिल्ह्यातील वरिष्ठ व निवड श्रेणी प्रस्तावधारक शिक्षक बांधवांच्या वतीने होतांना दिसून येत आहे.

## दर्गा नासर जंग इनाम जमिनी प्रकरणी एसआयटी मार्फत चौकशी करा– सय्यद सलीम बापू

बीड। प्रतिनिधी

परळी येथील ऐतिहासिक दर्गा नासर जंग देवस्थान इनामी जमिनी प्रकरणी एस.आय.टी मार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी तहरीक – ए – इनाम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी केली आहे. असे की,मौजे शिवार परळी ता.परळी.बीड येथील सर्वे नंबर ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४२, ४३, २४०,२५९,३०३,३०४,३८८,३९५,३९८ व ३९९ हे सर्व सर्वे नंबर येथील ऐतिहासिक दर्गा नासर जंगची देवस्थान खिदमत माश इनामी जमीन असून वरील सर्व सर्वे मध्ये खुल्या अवैध प्रकारे खरेदी – विक्री करून तलाठी,तहसीलदार,दुय्यम निबंधक न.प. परळी व भूमी अभिलेख येथील कर्मचारी यांच्या संगनमताने चुकीचे सर्वे करून पी.टी.आर व पी.आर कार्डही सुद्धा देण्यात आली आहे.



वरील सर्वे नंबर मधील मिळकत ही पूर्णपणे ऐतिहासिक दर्गा नासर जंग देवस्थानाची खिदमत माश इनामी जमिनी असून वरील जमिनीवर लोकांनी अवैध प्रकारे अतिक्रमणे करून मोठ्या प्रमाणात अवैध बांधकाम ही केले आहे. तरी या व प्रकरणी आम्ही संबंधित कार्यालयांना वेळोवेळी निवेदने देऊनही आमच्या निवेदनाचे दखल न घेता अध्याप वरील प्रकरणी कसलीही कायदेशीर कार्यवाही करण्यात आलेली नाही. तरी वरील ऐतिहासिक दर्गा नासर जंग देवस्थान इनाम जमिनी प्रकरणी एस.आय.टी मार्फत चौकशी करून दोषींवर वक्फ अधिनियम १९९५ कलम ५२ (१) (अ) प्रमाणे व योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी अन्यथा येत्या ३० मे शुक्रवार रोजी सकाळी ११:०० वाजता जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय बीड समोर तहरीक – ए – इनाम संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असे संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी जिल्हा वक्फ मंडळ कार्यालय बीड व जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

## तांदळा उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली

### शेतकऱ्यांतून चिंता व्यक्त, शासन–लोकप्रतिनिधींनी दखल घ्यावी



बीड। प्रतिनिधी

जायकवाडी धरणाचे पाणी वंचित भागातील शेतकर्यांना मिळावे, यासाठी गेवराई तालुक्यातील तांदळा येथे अजय पाटील साळुंके गेल्या रविवारपासून दिवसांपासून उपोषण करीत आहेत. मंगळवारी त्यांची प्रकृती खालावल्याने शेतकऱ्यांतून चिंता व्यक्त होत आहे. या उपोषणाची दखल लोकप्रतिनिधी व शासनाने घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा पट्ट्यातील शेतीला मिळावे यासाठी १४० गावातील शेतकऱ्यांना लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा दुसरा टप्पा तांदळा येथे रविवारपासून सुरू असून अजय पाटील साळुंके हे उपोषणाला बसले आहेत. उपोषणामुळे त्यांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण कमी झाले आहे. त्यातच त्यांना साखरेचा आजार असल्याने शेतकऱ्यांतून चिंता व्यक्त होत आहे. त्यांनी उपचार घ्यावे यासाठी तांदळा ग्रामस्थ व बाहेर ठिकाणहून आलेले शेतकरी त्यांना आग्रह करीत आहेत, मात्र शासन जो पर्यंत मागण्या मान्य करीत नाही तो पर्यंत उपचार घेणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांच्या प्रकृतीला काही त्रास होऊ नये, यासाठी शासनाने या आंदोलनाची दखल घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. याच दरम्यान चकलांबा पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील यांनी उपोषणस्थळी भेट देऊन पाटील यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. मंगळवारी मादळमो येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर व कर्मचारी तपासणीसाठी आले होते. मात्र, पाटील यांची रक्तातील साखर अधिक दाखवली, ही शंका पाटील यांना वाटल्याने त्यांनी पुन्हा दोनवेळा साखर तपासली. यावेळी सदर ग्लूकोमीटर नादुरुस्त असल्याचे डॉक्टरांनी मान्य केले. यासह यावेळी पल्स तपासण्याचे यंत्रही खराब असल्याचे दिसून आल्याने उपस्थित शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला.

**शेतपाण्याची तरतूद नाही, मग पाणी मिळणार कसे– गुळवे**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, हे सोमवारी नांदेड येथे आले होते. येत्या पाच वर्षांत मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेतून मराठवाड्यातील शेतीला पाणी देऊ, असे म्हणाले. मात्र, मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेत शेतीसाठी पाणी देण्याची तरतूद नाही, या योजनेतून शेतीला पाणी ही तरतूद वगळली आहे, असे असल्याचे या योजनेतून शेतीला पाणी कसे मिळणार असा प्रश्न लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे यांनी उपस्थित केला आहे. शिवाय मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेत शेती व उद्योगांना पाणी द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

## भारत जिंदाबाद रॅलीत कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे: महेश आठवले

बीड। प्रतिनिधी

जम्मू–काश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकावर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठावीस भारतीयांची हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिन्दूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैनिकांनी अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी सिन्दूर ऑपरेशन यशस्वी केल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सैनिकांच्या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलीदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने बीड शहरात शुक्रवार दि. ३० मे २०२५ रोजी सकाळी ठिक ११ वाजता युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली भारत जिंदाबाद रॅली आयोजित करण्यात आली आहे. ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सुरुवात होऊन साहित्यरत आण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार आहे.

भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरात रिपाईच्यावतीने दिनांक ३० मे २०२५ शुक्रवार रोजी काढण्यात येणाऱ्या भारत जिंदाबाद रॅलीत बीड तालुक्यातील रिपाइं कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे रिपाइं युवक जिल्हाध्यक्ष महेश आठवले, साहील सवाई,योगेश वाघमारे, आनिकेत अरुण, राहुल कोकाटे, विशाल काबंळे, संकेत गायकवाड, आमोल जाधव, मिलिदं डोळस, निखिल ससाणे, नामदेव वाघमारे, ज्ञानेश्वर केंगार, वैभव गुलवेने,सिद्धेश्वर केंगार, शंकर येडवे, बालूराम केंगार, आदींनी केले आहे.

## पावसाचे पाणी शेतात साचल्याने कामे थांबली

पाटोदा। प्रतिनिधी

यावर्षी राज्यात मान्सूनचे लवकर आगमन होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे त्यानुसार आठ दिवसापूर्वीच मान्सूनपूर्व पावसाने बीड जिल्ह्यासह पाटोदा तालुक्यातील आहे पावसाने उन्हाळी पिके फळबागेच्या अतोनात नुकसान केले आहे तर खरीप हंगाम पेरणीपूर्व शेतीची कामे थांबवले आहेत यामुळे मृगनक्षत्रानंतर वेळेत होणारी पेरणी हाती पावसामुळे लांबणीवर पडली आहे मागील आठ ते दहा दिवसापासून अवकाळी पाऊस सतत पडत आहे त्यामुळे शेत शिवारात पाणी चाचणी असून शेतामध्ये पाणी साचण्याचे शेताच्या मशिदीचे कामे शेतकऱ्यांनी थांबवली आहे पावसामुळे येत्या दोन दिवसात पाऊस उघडला तरी देखील शेतीतील वापस होण्यासाठी आठ दिवसाचा कालावधी लागणार आहे त्यानंतर मशागत पेरणीच्या कामाला सुरुवात होईल यामुळे यावर्षी पाऊस पडला नाही म्हणून पेरणी लावणार नाही तर अति पावसामुळे वापसन्न झाल्यामुळे पेरणी लांबून पडण्याची शक्यता आहे खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणती अडचण जाणू नये यासाठी बियाणे खताची योग्य नियोजन करण्यात आले.


## खोलेश्वर मल्टीस्टेट को–ऑप. क्रेडीट सोसायटी लि., दिंद्रुड ता. माजलगांव जि. बीड

**मुख्य कार्यालय – माऊली कॉम्प्लेक्स, दिंद्रुड ता. माजलगांव जि.बीड**

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

**(केवळ सभासदांसाठी)**

खोलेश्वर मल्टीस्टेट को–ऑप. क्रेडीट सोसायटी लि., दिंद्रुड ता. माजलगांव जि.बीड च्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची चौदावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. १५.०६.२०२५ रोजी दुपारी ०१:०० वाजता खोलेश्वर मल्टीस्टेट मुख्य कार्यालय माऊली कॉम्प्लेक्स दिंद्रुड या ठिकाणी होणार आहे. सदर सभेत खालील विषयावर विचार विनिमय करण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती,

**सभेपुढील विषय**

१) मागील वर्षी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे बाबत.
२) ३१/०३/२०२५ अखेरच्या ताळेबंद, नफा तोटा व तेरीज पत्रक वाचून मंजूर करणे बाबत.
३) ३१/०३/२०२५ अखेरच्या लेखा परिक्षण अहवालाचे वाचन करून मंजूर करणे बाबत.
४) नवीन सभासदांना मंजुरी देणे बाबत.
५) आर्थिक वर्ष २०२५–२०२६ साठी तयार केलेल्या अंदाज पत्रकास मान्यता देणे बाबत.
६) आर्थिक वर्ष २०२५–२०२६ साठी वैधानिक लेखा परिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधनास मान्यता देणे बाबत.
७) समोपचार कर्ज परतफेड योजनेस मंजुरी देणे बाबत.
८) कर्मचारी व संचालकांचे कर्ज व त्यांच्या नातेवाईकांचे कर्ज यादीवर चर्चा करून मान्यता देणे बाबत.
९) कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीस मान्यता देणे बाबत.
१०) आर्थिक वर्ष २०२४–२०२५ वर्षात झालेल्या नफा विभागणीस मंजुरी मिळणे बाबत.
११) आर्थिक वर्ष २०२४–२०२५ वर्षात झालेल्या नफ्यापैकी लाभांश वाटपास मंजुरी मिळणे बाबत.
१२) संस्थेच्या व्यवसाय विस्तार वाढीच्या दृष्टिकोनातून विविध सहा ठिकाणी संस्थेच्या शाखा सुरू करण्यासाठी केंद्रीय निबंधक यांच्याकडे प्रस्ताव दाखल करून मंजुरी घेणे बाबत.
१३) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करून निर्णय घेणे बाबत.

| स्थळ | दिनांक | मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून |
|---|---|---|
| दिंद्रुड ता. माजलगांव | २८/०५/२०२५ | मुख्य कार्यकारी अधिकारी |

टीप : १) गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सदर सभा ठरलेल्या ठिकाणीच ठरलेल्या तारखेसच एक तासानंतर घेण्यात येईल त्यास गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही. २) ज्या सभासदांना संस्थेच्या कामकाजाबाबत काही प्रश्न विचारायचे असल्यास त्यांनी आपले प्रश्न संस्थेच्या कार्यालयात सात दिवस अगोदर मिळतील असे पाठवावेत. ३) ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळतीलच असे नाही.


# आरोग्य विभाग कोमात अन् महावितरण जोमात

## वीजजोडणीच नसलेल्या च–हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राला ९० हजारांचे वीजबिल

बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील च–हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला वीज जोडणी नसल्याने परीसरातील ग्रामस्थांना वीज जोडणी अभावी प्रसुती, शस्त्रक्रिया,आंतररूग्ण विभाग या आरोग्य सुविधा मिळत नसल्याने रूग्णांची हेळसांड होत असुन रूग्णांना उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करून बीड येथे जावे लागते. वीजे अभावी रूग्णांची हेळसांड थांबावी म्हणून वीज जोडणीसाठी निधी मिळावा यासाठी डॉ.गणेश ढवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी निवेदने व आंदोलनाच्या माध्यमातून १० लक्ष रुपयांचा निधी जिल्हा प्रशासनाकडून मंजूर करून घेतला असताना एकीकडे त्याचे अद्याप काम सुरू नसताना आणि वीज जोडणी नसताना महावितरणचे तब्बल ९० हजार रुपये वीजबिल आले असुन संबंधित प्रकरणी वैद्यकीय अधिकारी डॉ.मदन काकड यांनी सहाय्यक अभियंता म.रा.वि.वि.कं.नवगण राजुरी बीड यांना प्राथमिक आरोग्य केंद्र च–हाटा येथे अद्याप विद्युत जोडणी झालेली नसतानाही




येत असलेल्या विजबील बाबतीत शहानिशा करून वीजबील येणार नाही याची दक्षता घ्यावी असे लेखी पत्राद्वारे कळवुनही दर महिन्याला वीजबील येतच असुन हा आकडा ९० हजारांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे एकंदरीतच आरोग्य विभाग कोमात आणि महावितरण जोमात असं म्हणण्याची वेळ आली असल्याची उद्विग्न प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिली आहे.

बीड तालुक्यातील च–हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य ईमारत आणि वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने ८ वर्षांपूर्वी तब्बल ५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आले असुन सुरूवातीपासुनच वीज जोडणी अभावी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत शोभेची वस्तू बनली आहे. वीजजोडणी साठी निधी देण्यात यावा या मागणीसाठी सामाजिक डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , च–हाटा येथील शेख युनुस,सुदाम तांदळे, मनोज तांदळे, सुभाष बांगर,संपत नागरगोजे, सुर्यकांत नागरगोजे, हरिश्चंद्र जाधव,भगिरथ उबाळे,बप्पासाहेब पवार आदींनी दि.१४ आक्टोबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील साठवण तलावात जलसमाधी आंदोलन केले होते.त्यानंतर याची दखल सीईओ जिल्हा परिषद बीड आदित्य जीवने यांनी च–हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ईमारत व कर्मचारी निवासस्थान यांच्या विद्युतीकरणासाठी विद्युत रोहित्र बसविणे कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन २०२४–२५ अंतर्गत १० लक्ष रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली होती. मात्र अद्याप काम सुरूच करण्यात आले नाही. यामुळे एकंदरीतच जिल्हा प्रशासन आणि आरोग्य विभागाला यांचे गांभीर्य दिसून येत नसल्याची संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.

# जाहिरनाम्याची होळी..महायुती सरकारचा धिक्कार!

## तांदळा उपोषणाचा चौथा दिवस, शासन प्रशासनाच्या नावाने बोंबाबोंब

**कोळगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील १४० गावातील शेतकऱ्यांनी लोकलढा आंदोलन उभारले असून मौजे तांदळा येथे जायकवाडीच्या पाण्यासाठी आमरण उपोषण सुरु आहे, उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली असून याकडे दुर्लक्ष करणाऱ्या शासन प्रशासनाच्या नावाने शेतकऱ्यांनी बोंबाबोंब केली आहे,१४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत महायुती सरकारचा जाहिर नाम्याची होळी करत सरकारचा धिक्कार केला आहे.उपोषणकर्त्ये अजय पाटील यांनी पुन्हा एकदा उपचार नाकारले असल्याने परिस्थिती गंभीर बनत चालली आहे.




जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा पट्ट्यातील शेतीला मिळावे यासाठी १४० गावातील शेतकऱ्यांना लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा दुसरा टप्पा तांदळा येथे रविवारपासून सुरू असून अजय पाटील साळुंके हे उपोषणाला बसले आहेत. उपोषणाच्या चौथा दिवशी त्यांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण कमी झाले आहे. त्यातच त्यांना साखरेचा आजार असल्याने शेतकऱ्यांतून चिंता व्यक्त होत आहे. त्यांनी उपचार घ्यावे यासाठी तांदळा ग्रामस्थ व बाहेर ठिकाणहून आलेले शेतकरी त्यांना आग्रह करीत आहेत, मात्र शासन जो पर्यंत जायकवाडीच्या पाण्यासाठी ठोस भूमिका (उपाययोजना) करत नाही तो पर्यंत उपचार घेणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांच्या प्रकृतीला काही त्रास होऊ नये, यासाठी शासनाने या आंदोलनाची दखल घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. उपोषणाच्या चौथ्या दिवशी नायब तहसीलदार सुभाष कट्टे यांनी उपोषणस्थळी भेट दिली असता ठोस निर्णय न झाला नाही.यावेळी शेतकऱ्यांनी नायब तहसीलदार यांना निवेदन दिले आहे.

### मी शेतकऱ्यांसोबत– खा. सोनवणे

तांदळा येथील उपोषणकर्ते अजय पाटील साळुंके यांच्याशी बुधवारी खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी भ्रमणध्वनीवरून संवाद साधला. शेतकर्यांचे पाण्याविना हाल होत आहेत, या भागातील शेतीला धरणाचे पाणी गरजेचे आहे, यासाठी शेतकर्यांनी जे लोकलढा आंदोलन सुरू केले आहे, त्यास आपला पाठिंबा असल्याचेही ते म्हणाले.

### गेंड्याच्या कातडीचे सरकार– नांदगावकर

मनसे नेते तथा माजी आमदार बाळा नांदगावकर यांनी बुधवारी आंदोलकांशी भ्रमणध्वनीवरून संवाद साधला. नांदगावकर म्हणाले, की हे गेंड्याच्या कातडीचे सरकार आहे, हे सरकार शेतकऱ्यांना न्याय देऊ शकत नाही, मनसे शेतकऱ्यांसोबत असून शेतकर्यांसाठी आंदोलनात उतरू असेल नांदगावकर म्हणाले.

## प्रा.अनिता कसबे यांना विभागीय आदर्श हिंदी शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ हिंदी शिक्षक महासंघाच्या वतीने सौ.के.एस.के.महाविद्यालयाच्या प्रा.अनिता कसबे यांना विभागीय आदर्श हिंदी शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नाशिक विभागाचे पदवीधर आमदार सत्यजित तांबे, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे अध्यक्ष रावसाहेब घाडगे पाटील, महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ.मिलिंद कांबळे, प्रदेश सचिव रेवंत कर्दळे, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ.राजकुमार कांबळे, राज्य कोषाध्यक्ष सुंदर लोधे यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम नेवासा जिल्हा अहिल्यानगर येथे संपन्न झाला. या कार्यक्रम हिंदी शिक्षक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय कार्यशाळेत राज्यातील दोनशे शिक्षक सहभागी झाले होते.

## अधिकारी व पदाधिकारी प्रमाणिक असतील तर सामान्य जनतेचा विकास वेगाने होईल – प्रा.ईश्वर मुंडे

### पो.नि. देवीदास वाघमोडे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्कृष्ट प्रशासक पुरस्कार जाहीर

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील आसरडोह येथे मागील पंचवीस वर्षापासून राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी केली जाते. या वर्षी दि.२६ मे २०२५ सोमवार रोजी आसरडोह येथील जयंतीचा रौप्य महोत्सव व पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या त्रिशताब्धी जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे पदावरून बोलताना राष्ट्रवादी कॉंग्रेस चे नेते प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की, लोकशाहीमध्ये जनतेने प्रमाणिक उमेदवाराला आपले बहुमूल्य मतदान देवून विजयी करणे हेच देश कार्य आहे.अधिकारी व पदाधिकारी प्रमाणिक असतील तर राष्ट्र माता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना अपेक्षित सामान्य जनतेचा विकास वेगाने होईल. सद्य स्थितीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा प्रशासकीय कार्याचा वारसा प्रभावीपणे चालवणाऱ्या अधिकाऱ्याला प्रती वर्षी आपल्या समितीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर उत्कृष्ट प्रशासक पुरस्कार देण्यात यावा.या मुळे अधिकारी-कर्मचारी यांचे मनोबल वाढून त्यांच्या हातून जन हिताची कामे अधिक होतील.अशी संकल्पना मांडली.या संकल्पनेला उपस्थितांनी टाळयाच्या कडकडाटात प्रतिसाद दिला व सन २०२५ चा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ऊत्कृष पुरस्कार धारूर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक श्री देवीदास वाघमोडे यांना सर्वानुमते जाहीर करण्यात आला.

लवकरच त्यांना हा पुरस्कार मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमास जेष्ठ नेते माऊली तात्या गडदे,सरपंच रविकिरण देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात परिसरातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व नवीन नौकरी लागलेल्या कर्मचाऱ्यांचा -हदय सत्कार करण्यात आले. आसरडोह येथील ◀◀ पान ३ वर

## आषाढीवारीपर्यंत उड्डाणपूलाचे काम स्थगित करावे –गोपाळ आंधळे

**परळी वै.। प्रतिनीधी**

वारकरी संप्रदायाची सर्वात मोठी आध्यात्मिक पर्वणी म्हणून ओळख असलेली पंढरपूरच्या आषाढी वारीला सुरूवात होत आहे.परळी वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्रात विदर्भ आणी इतर भागातून शेकडो दिंड्या मुक्कामी शहरात दाखल होत असतात.त्या सर्व वारकर्यांची गैरसोय होवू नये. या साठी शामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूलाचे प्रस्तावित काम आषाढी एकादशी पर्यंत स्थगित करावे अशी मागणी न.प.चे माजी शिक्षण सभापती गोपाळ आंधळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.



वारकरी संप्रदायाचे व सबंध महाराष्ट्राचे आराध्य दैवत.पंढरीचा पांडुरंग परमात्मा श्रीविठ्ठलाचा आषाढी वारीचा सोहळा अगदी कांही दिवसांनी सुरू होत आहे.परळी वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र असल्यामुळे खास करून विदर्भातील शेकडो दिंड्या या परळी शहरात मुक्कामी असतात. परंतु प्रस्तावित शामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूलाच्या दुरुस्तीच्या कामामुळे हा पुल वाहतूकीसाठी दिर्घकाळ बंद ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून जाहीर करण्यात आले आहे.हा पुल बंद झाल्यावर वारकर्यांची मोठी गैरसोय होणार तर आहेच .परंतु अनादी काळापासून चालत आलेली परळी मुक्कामाची परंपरा बंद होईल.त्यामुळे प्रशासनाकडून हे प्रस्तावित काम आषाढी वारी संपन्न झाल्यावरच पुलाच्या दुरूस्तीचे काम करावे अशी मागणी माजी शिक्षण सभापती गोपाळ आंधळे यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केली आहे.

## अवकाळी पावसाने ज्वारी पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करा –भाई थावरे

**माजलगाव । प्रतिनिधी**

**राज्यात अवकाळी पावसाचे थैमान चालू असून माजलगाव तालुक्यातील अवकाळी पाऊस पडला असल्यामुळे ज्वारीच्या पिकाचे नुकसान झाले असून त्याचे तात्काळ पंचनामे करावे अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष भाई गंगाभिसन थावरे यांनी तहसीलदार यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.**



भाई गंगाभिषण थावरे यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की. माजलगाव तालुक्यात गेल्या तीन दिवसापासून अवकाळी पाऊस पडत असल्यामुळे उभी असल्याने ज्वारीच्या दाण्या मध्ये पाणी गेल्यामुळे ते वाफले असून सर्व पीक जमीनदोस्त झाले आहे. तसेच आनंदगाव येथील संग्राम गंगाभिषण थावरे यांची जमीन मौजे आनंदगाव शिवरत गट क्रं.११८ मध्ये ज्वारी असून या पिकाचे दिनांक २५ मे रोजी सकाळी अवकाळी पावसामुळे शेतातील ज्वारी या पिकाचे संपुर्ण नुकसान आहे. म्हणून या शेतकऱ्यासह अन्य शेतकऱ्यांची नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करून तात्काळ पंचनामे करावेत अशी मागणी भाई थावरे यांनी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

### पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव

## ना. पंकजाताई मुंडेंनी कार्यकर्त्यांसह वैद्यनाथ मंदिरात केली स्वच्छता ; महा आरतीही केली

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

आदर्श राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती उत्सवानिमित्त परळी भाजपच्या वतीने ना.पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत स्वच्छता मोहीम आणि महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. या जयंती उत्सवात ना. पंकजाताई मुंडे यांनी सहभागी होऊन स्वच्छता मोहिमेत भाग घेतला. कुशल प्रशासक, कर्तव्यतत्पर आणि न्यायप्रिय राज्यकर्त्या अहिल्यादेवी होळकर यांची तत्व अंगीकरून आम्ही लोकसेवेची कार्य करत आहोत, त्यांची शिकवण सर्वांसाठी प्रेरणादायी





असल्याची भावना पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अनुषंगाने परळी भाजपने राज्याच्या पशूसंवर्धन आणि पर्यावरन व वातावरणीय बदल मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत वैद्यनाथ मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम आणि महाआरती आयोजित केली होती. ना. पंकजाताई मुंडे यांनी याप्रसंगी कार्यकर्त्यांसह मंदिर परिसर स्वच्छ केला. तसेच मंदिर परिसरात असलेल्या अहिल्यादेवींच्या पुतळ्यासमोर महाआरती करून त्यांना वंदन केले. यावेळी यळकोट यळकोट, जय मल्हार आणि अहिल्यादेवींच्या नाम घोषाने परिसर दणाणून गेला होता. याप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, ज्येष्ठ नेते राजेश देशमुख, सतीश मुंडे, मंडल अध्यक्ष राजेश गिते, बंडू निर्मळ, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, पवन मुंडे, रवि कांदे, प्रकाश जोशी, नितीन समशेट्टे, अरूण पाठक, मोहन जोशी, बळीराम गडदे, चंद्रकांत देवकते, संजय मुंडे, प्रशांत कराड, प्रितेश तोतला, आश्विन मोगरकर, अनिश अग्रवाल, सुशील हरंगुळे, राजेंद्र ओझा, ज्ञानोबा सुरवसे, सचिन गिते आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धार्मिक ऐक्यासाठी समस्त जातींचे संघटन करण्याचे कार्य स्वातंत्र्यवीर सावरकरांनी केले

**बीड । प्रतिनिधी**

**हिंदूंच्या धार्मिक संघटनासाठी सर्वप्रथम समस्त जाती एकत्र यायला हव्यात. सर्वांना समान वागणूक आणि न्याय मिळाला पाहिजे, हा विचार मांडत स्वातंत्र्यवीर सावरकरांनी विविध कृतिशील उपक्रम राबवत सामाजिक ऐक्य प्रस्थापित केले. त्यांनी स्वधर्माचे जागरण करताना कोणत्याही धर्माचा द्वेष केला नाही, असे प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नेत्या, डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले.**



### डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचे प्रतिपादन; बीडमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त अभिवादन

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४२ व्या जयंतीनिमित्त शहरातील जवाहर कॉलनी येथील सावरकर पुतळ्याजवळ वीर सावरकर सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात ◀◀ पान ३ वर

### महाराष्ट्र लोकसेवा आयोग गट–क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा

## बीडमध्ये १२ उपकेंद्रावर ३४३० परीक्षार्थी

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र गट–क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ दिनांक ०१ जून २०२५ रोजी बीड जिल्हा केंद्रावरील एकूण १२ उपकेंद्रामधून सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी एकूण ३ हजार ४३० उमेदवार बसलेले आहेत.**

परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी १२ उपकेंद्रप्रमुख १२ मदतनीस ५३ पर्यवेक्षक १६९ समवेक्षक असे एकूण २४६ अधिकारी, कर्मचारी यांची जिल्हा प्रशासनाद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना दिनांक २६ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन सभागृह बीड येथे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख यांनी परीक्षेच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले आहे.

१०० मीटर परिघात मनाई आदेश※

परीक्षेच्या कालावधीत उपकेंद्रावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परीक्षा उपकेंद्रावर पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेला आहे.

आयोगाच्या सूचनेनुसार या परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांना त्यांच्याकडील मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अभ्यासाचे इतर साहित्य परीक्षा केंद्रावर घेऊन जाण्यास मनाई आहे. आयोगाने दिलेल्या सूचनेप्रमाणे उमेदवारांना जेवणाचा डबा, अल्पोपहार व पाण्याची बॉटल घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येत आहे. पेपरच्या वेळेमध्ये उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास मनाई आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने नेमून दिलेल्या परीक्षेचे आवश्यक साहित्यच उमेदवारांना जवळ बाळगण्याची मुभा राहील तसेच सर्व उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी प्रवेश पत्रासोबत त्यांचे स्वतःच्या आधारकार्ड, निवडणूक आयोगाची ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे आवश्यक आहे. उमेदवारांना त्यांच्या परीक्षा व उपकेंद्रावर परीक्षेकरिता सकाळी ०८.३० वाजता उपस्थित राहावे. सकाळी ०९.३० वाजता नंतर परीक्षा केंद्रावर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश देण्यात येणार नाही, असे निवास उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा केंद्र प्रमुख शिवकुमार स्वामी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# पावसाळ्यापूर्वी ५ लाखांपेक्षा जास्त प्राण्यांचे लसीकरण पूर्ण; जिल्हा परिषदेचा निर्णय

पुणे/ प्रतीक धामोरीकर: पावसाळ्यापूर्वी संसर्गजन्य आजारांपासून प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत पुणे जिल्ह्यात व्यापक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम १५ जूनपर्यंत राबविण्यात येणार असून आतापर्यंत जिल्ह्यात ५,७०,७९१ जनावरांचे लसीकरण करण्यात आले आहे. पावसाळ्यात डास, फर्या (ब्लॅक क्वार्टर – बीक्यू), एन्टरोटॉक्सिमिया आणि लम्पी स्किन डिसीज (एलएसडी) सारख्या आजारांपासून जनावरांचे संरक्षण करणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.



या आजारांचा संसर्ग रोखण्यासाठी आणि पावसाळ्यात जनावरांच्या मृत्युदर कमी करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने विशेष प्रयत्न केले आहेत. मोहिमेअंतर्गत मिळालेल्या ५,९७,२०० लसींचा साठा गावपातळीवर वितरित करण्यात आला आहे. मान्सूनपूर्व लसीकरणात ३,४७,३९६ गायी, ३६,८०८ म्हशी आणि २८,०७४ वासरांचे लसीकरण करण्यात आले आहे. जिल्ह्यात १५ मे पर्यंत लम्पी स्किन डिसीजचे लसीकरण पूर्ण झाले असून इतर संसर्गजन्य आजारांसाठी मोहीम सुरू असल्याची माहिती जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. विष्णु गर्जे ह्यांनी दिली.

जनावरे कोणत्या आजारांना बळी पडतात?

पावसाळ्यात जनावरांना अनेक आजार होण्याची शक्यता असते. त्यात मुख्तय फर्या (ब्लॅक क्वार्टर – बीक्यू): हा एक गंभीर आजार आहे ज्यावर वेळेवर उपचार न केल्यास जनावरांचा मृत्यू होऊ शकतो. पुणे जिल्ह्यात गायींना या आजारापासून वाचवण्यासाठी बीक्यू लस दिली जात आहे. आतापर्यंत २५,१६२ बीक्यू डोस देण्यात आले आहेत.

घटसर्प (हेमोरेजिक सेप्टीसीमिया – एचएस): या आजारात मृत्युदर बराच जास्त आहे. विशेष लसीकरण मोहिमेत गायी आणि म्हशींना एचएस लस दिली जात आहे. आतापर्यंत १,३८,०९६ घटसर्प च्या लसी देण्यात आल्या आहेत. घट्टसर्प स्किन डिसीज (एलएसडी) हा आजार पावसात वेगाने पसरतो आणि वेळेवर उपाययोजना न केल्यास जनावरांचा मृत्यू होऊ शकतो.

अंत्रविषार (एन्टरोटॉक्सिमिया): या आजारासाठी प्राण्यांनाही लसीकरण केले जात आहे, त्यापैकी १,८३,४४८ डोस देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील सर्व सरकारी पशुवैद्यकीय रुग्णालयांमध्ये मान्सूनपूर्व उपाययोजने अंतर्गत पाळीव प्राण्यांना लसीकरण केले जात आहे. संसर्गजन्य रोगांपासून प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी, शेतकरी आणि पशुपालकांनी त्यांच्या जवळच्या पशुवैद्यकीय रुग्णालयात जाऊन त्यांच्या प्राण्यांना लसीकरण करून घ्यावे.

– डॉ. विष्णू गर्जे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद पुणे,

# 'भीमनगरवासियांची फसवणूक होऊ देऊ नका'; मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या एसआरए अधिकाऱ्यांना सूचना

पुणे : एरंडवणे येथील भीमनगर झोपडपट्टीचे एसआरएअंतर्गत पुनर्वसन योजनेत झोपडपट्टीधारकांची कोणतीही फसवणूक होऊ देऊ नका. गरज पडल्यास नागरिकांना अधिकच्या सुविधा द्याव्यात किंवा संपूर्ण स्कीम रद्द करावी, अशा सूचना उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश गटणे यांना दिल्या आहेत.

भीम नगर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत फसवणूक व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत, मूळ जागेपासून नऊ किलोमीटर लांब सक्तीचे स्थलांतर अमान्य करत झोपडपट्टीधारकांनी याविरोधात गेल्या काही दिवसांपासून आंदोलन पुकारलेले आहे. यासंदर्भात त्यांनी नुकतेच मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या कार्यालयावर बिऱ्हाड मोर्चा नेला होता. या बिऱ्हाड मोर्चाच्या पार्श्वभूमीवर चंद्रकांत पाटील व झोपडपट्टीधारकांचे प्रतिनिधींची संयुक्त बैठक पार पडली. या



बैठकीत नागरिकांच्या समस्या ऐकून घेऊन कोणत्याही परिस्थितीत झोपडपट्टी धारकांची फसवणूक होणार नाही. याबाबत आपण सर्व ती काळजी घेऊ, असे आश्वासन त्यांनी झोपडपट्टीधारकांना दिले.

तसेच झोपडपट्टीधारकांच्या हिताच्या दृष्टिकोनातून सदर पुनर्वसन प्रक्रियेमध्ये झोपडपट्टी धारकांना अधिक लाभ देण्यात यावा. अथवा फसवणूक झाली असल्यास संपूर्ण योजना रद्द करावी, अशा सूचना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश गटणे यांना चंद्रकांत पाटील यांनी दिल्या आहेत.

दरम्यान, मंत्री चंद्रकांत पाटील यांनी झोपडपट्टीधारकांच्या हिताचा विचार मांडल्याने आंदोलनात बळकटी प्राप्त झाली असून, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झोपडपट्टीधारकांना फसवणूक करण्याचा इरादा ठेवणाऱ्या बिल्डरांना यामुळे चाप लागणार असल्याची भावना यावेळी रिपब्लिकन युवा मोर्चाचे राहुल डंबाळे, स्थानिक रहिवासी देविदास ओव्हाळ, प्रभु सूनगर, जावेद शेख दादू गायकवाड व सुनील डमरे यांनी व्यक्त केली.

# महावितरणला पावसाचा चांगलाच तडाखा; ९२४ खांब जमीनदोस्त तर



बारामती : मागील आठवड्यात विशेषत: २५ व २६ मे रोजी महावितरणच्या बारामती मंडलातील ६ उपकेंद्रांना व त्यांतर्गत १० उच्चदाब वाहिन्यांना मान्सूनपूर्व पावसाचा सर्वाधिक फटका बसला. लघुदाबाचे ६५७ तर उच्चदाबाचे २६७ असे ९२४ खांब जमीनदोस्त झाले आहेत. कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमानंतर बहुतांश उपकेंद्रांचा वीजपुरवठा काही तासांतच पूर्ववत करण्यात महावितरणला यश आले असून, अद्याप फक्त २११३ बिगरशेती ग्राहकांचा वीजपुरवठा बंद आहे. तो पूर्ववत करण्यासाठी वीज यंत्रणा अहोरात्र झटत आहे. मुख्यालय व परिमंडलातील 'वॉर रुम' परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

महावितरण बारामती मंडलात पुण्यातील बारामती, इंदापूर, दौंड, शिरुर, पुरंदर व भोर या सहा तालुक्यांचा समावेश आहे. पूर्वमोसमी पावसाने धुमाकूळ घालत ६ उपकेंद्रांना तडाखा दिला. यामध्ये बारामती विभागातील लोणी देवकर, भिगवण, सणसर, काळेवाडी तर केडगाव विभागातील देऊळगाव व मलठण उपकेंद्रांचा समावेश आहे. या सर्व उपकेंद्राचा वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. अनेक ठिकाणी वीज वाहिन्यांवर झाडे, फांद्या कोसळल्या. त्यामुळे तारा तुटून पडल्या. मात्र, यंत्रणा सतर्क असल्याने कुठेही वीज अपघात घडला नाही. सुरक्षेची पूर्ण काळजी घेत वीजपुरवठा सुरु करण्यात आला आहे. बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती मंडलाचे अधीक्षक अभियंता दीपक लहामगे वीजपुरवठा युद्धपातळीवर सुरु करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. 'वॉर रुम' व नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत आहेत. वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी लागणारे साहित्य, विजेचे खांब, रोहित्र व ऑईलचा मुबलक पुरवठा सर्व विभागांना करण्यात आलेला आहे. तसेच सर्व वीज कर्मचाऱ्यांना मुख्यालयी व मोबाईलवर उपलब्ध राहण्याचे आदेशही महावितरणने दिले आहेत.

# छत्रपती कारखान्याचे ठरले कारभारी! अध्यक्षपदी पृथ्वीराज जाचक तर उपाध्यक्षपदी कैलास गावडे

**बारामती । प्रतिनिधी**

भवानीनगर येथील श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदी पृथ्वीराज साहेबराव जाचक यांची तर उपाध्यक्षपदी कैलास रामचंद्र गावडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे व पृथ्वीराज जाचक यांच्या नेतृत्वाखालील श्री जय भवानी माता पॅनेलने २१ पैकी २१ जागा जिंकून निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले होते.

या निवडणुकीपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पृथ्वीराज जाचक यांचे अध्यक्ष पदासाठी नाव घोषित केले होते, त्यामुळे अध्यक्षपदी पृथ्वीराज



जाचक यांची निवड निश्चित होती, मात्र उपाध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार, याची उत्सुकता होती. बुधवारी (दि २८) सकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या काटेवाडी येथील निवासस्थानी क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत कारखान्याच्या विद्यमान संचालक मंडळाची बैठक पार पडली, या बैठकीत उपमुख्यमंत्री पवार यांच्या सूचनेनुसार अध्यक्षपदासाठी जाचक तर उपाध्यक्ष पदासाठी गावडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

यावेळी अजित पवार यांनी संचालक मंडळाला सूचना दिल्या. यानंतर छत्रपती कारखान्याच्या सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये अध्यक्ष पदासाठी जाचक तर उपाध्यक्ष पदासाठी गावडे यांचे नामनिर्देशन अर्ज दाखल झाले, यानंतर अध्यक्षपदी पृथ्वीराज जाचक तर उपाध्यक्षपदी कैलास गावडे यांची बिनविरोध निवड नावडकर यांनी जाहीर केली. या निवडीनंतर नवनिर्वाचित अध्यक्ष उपाध्यक्षांचा सत्कार वैभव नावडकर यांच्या हस्ते करण्यात आला. यानंतर कार्यकारी संचालक अशोक जाधव यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व संचालक मंडळाचा सत्कार केला, कामगार नेते युवराज रणवरे यांनी कामगारांच्या वतीने नवनिर्वाचित संचालक मंडळांचा सत्कार केला. दरम्यान यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास नवनिर्वाचित अध्यक्ष उपाध्यक्ष सचालक मंडळाच्या वतीने पुष्पहार अर्पण करण्यात आला.

### छत्रपती ला गतवैभव प्राप्त करू

**यावेळी अध्यक्ष पृथ्वीराज जाचक म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह सर्व सभासदांचे, कामगारांचे मी मनापासून आभार मानतो. आभाराला शब्द कमी पडत आहेत. फार मोठे यश सभासदांनी आम्हाला दिले. सभासदांना दिलेले आश्वासन आम्ही पाळू. छत्रपती कारखान्याला गत वैभव प्राप्त करून देण्यासाठी आम्ही सर्व संचालक मंडळ कटीबद्ध आहोत, अशा भावना नवनिर्वाचित अध्यक्ष पृथ्वीराज जाचक यांनी व्यक्त केल्या.**

# दिलासादायक ! मुसळधार पडणाऱ्या मान्सूनची गती आता मंदावणार; शुक्रवारपासून तर

पुणे । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून फक्त पुणे, मुंबईच नाहीतर इतरही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस होताना दिसत आहे. त्यातच केरळमध्ये आठ दिवस तर महाराष्ट्रात बारा दिवस आधी दाखल झालेल्या मान्सूनने मुंबईत पोहोचण्याचा ११७ वर्षांचा विक्रम मोडला. मात्र, २७ मे पासून म्हणजेच मंगळवारपासून मोसमी पावसाच्या प्रवासाची गती कमी होणार आहे. शुक्रवारपासून (दि.३०) आकाश ढगाळ राहून हलक्या स्वरूपाच्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदा सुमारे १० ते १५ दिवस लवकर मोसमी वारे पुण्यात दाखल झाले. मात्र, मंगळवारी पावसाची तीव्रता थोडी कमी झाली. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री पावणेनऊपर्यंत शिवाजीनगर येथे १५.७, लोहगाव येथे २३.२, चिंचवड येथे २९, मगरपट्टा येथे १८, कोरेगाव पार्क येथे ५, तर एनडीए येथे २४.५ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. त्यापूर्वीही काही दिवस सातत्याने शहर आणि परिसरात पावसाच्या सरी कोसळत आहेत. तर सोमवारीही शहर आणि परिसरात मुसळधार पाऊस पडला. दरम्यान,



पुढील तीन दिवसांत घाट परिसरात मुसळधार, तर शहर आणि परिसरात मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. शुक्रवारपासून (दि.३०) आकाश ढगाळ राहून हलक्या स्वरूपाच्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

हवामान होईल कोरडे

डॉ. देवरस यांच्या अंदाजानुसार, २७ मे पासून राज्यातील हवामान हळूहळू कोरडे होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढही होईल. मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. पाच जूनपर्यंत ही स्थिती कायम राहील. यामुळे पाच जूनपर्यंत राज्यातील बहुतांश भागात मोसमी पावसाची शक्यता दिसत नाही. मुंबईत दाखल झालेल्या मान्सूनचा पुढील प्रवास तात्पुरता थांबू शकतो.

परदेशातील हवामानाचा पहिल्यांदाच परिणाम

मंगळवारी पश्चिम रशियावर एक जास्त दाबाचा पट्टा निर्माण होणार आहे. त्यामुळे पहिल्यांदाच विदेशातील हवामान बदलाचा परिणाम भारतावर होणार आहे. रशियावर निर्माण होणारा कमी दाबाचा पट्टा भारतातील आणि विशेष करून महाराष्ट्रातील मोसमी पावसावर नकारात्मक परिणाम करेल. तो वाऱ्यांच्या दिशेत मोठे बदल घडवून आणणार आहे.

# हगवणे बंधूंनी आई व बहिणीचा मोबाइल केला लंपास...; पोलिसांची न्यायालयात माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात सासू लता आणि नणंद करिष्मा यांचे मोबाइल या गुन्ह्यातील फरार आरोपी नीलेश चव्हाण याच्या मदतीने पती व दिराने लंपास केले आहेत. या मोबाइलमध्ये पती शशांक याने पत्नी वैष्णवी यांना मारहाण केल्याचे आणि आरोपींमधील संभाषणाचे पुरावे असू शकतात, अशी माहिती पोलिसांनी न्यायालयात दिली.

हुंड्यासाठी मानसिक, शारीरिक छळ करून वैष्णवी हगवणे यांना आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी अटकेत असलेला पती शशांक राजेंद्र हगवणे (वय २७), सासू लता राजेंद्र हगवणे (वय ५४), नणंद करिष्मा राजेंद्र




हगवणे (वय ३१), सासरा राजेंद्र तुकाराम हगवणे (वय ६३), दीर सुशील राजेंद्र हगवणे (वय २७) यांच्या पोलीस कोठडीची मुदत बुधवारी (दि. २८) संपली.

त्यामुळे पाचही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले होते. नीलेशचा राजेंद्र आणि सुशील यांच्या मदतीने शोध घेण्यात येत आहे, तर लता करिष्मा व सुशील हगवणे यांच्या मोबाइलचा देखील शोध सुरू आहे. चव्हाण व सुशील हगवणे यांच्यामधील गुन्ह्याच्या अनुषंगाने झालेले चॅट, मेसेजस हे पुराव्यासाठी जप्त करण्यात येत आहेत. वैष्णवी यांचा मृत्यू होण्यापूर्वी शशांक याने त्यांना तीन आणि पाच दिवस आधी वेगवेगळ्या हत्यारांनी मारहाण केली आहे.

त्याने आणखी कोणत्या हत्याराने मारहाण केली, याचा शशांककडे तपास करून ते हत्यार जप्त करायचे आहे. त्यामुळे शशांक, लता आणि करिष्मा हगवणे यांच्या पोलीस कोठडीचे हक्क अबाधित ठेवून एक दिवसांची, तर राजेंद्र आणि सुशील यांच्या पोलीस कोठडीत सात दिवसांची वाढ करण्यात यावी, असा युक्तिवाद सरकारी वकील नितीन अडागळे यांनी केला. फिर्यादींच्या वतीने ॲड. शिवम निंबाळकर यांनी काम पाहिले. आरोपींच्या वतीने ड. विपुल दुशिंग यांनी युक्तिवाद केला.

# धायरी परिसरात भीषण वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त

**पुणे । प्रतिनिधी**

**धायरी (नऱ्हे) येथील पारी चौक परिसरात दररोज होणाऱ्या भीषण वाहतूक कोंडीने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून, यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे विभागप्रमुख महेश राजाराम पोकळे यांनी वाहतूक विभागाकडे अधिकृत निवेदन सादर केले आहे.**

या निवेदनात त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, पारी चौकाजवळील चछ्रह्ह कंपनीचा उछ्रह्ह पंप हे वाहतूक कोंडीचे मुख्य केंद्र बनले आहे. अरुंद रस्ता आणि पंपावर उछ्रह्ह भरण्यासाठी लागणारी वाहने रस्त्यावर उभी राहत असल्याने, परिसरातील वाहतुकीवर मोठा ताण निर्माण होतो आहे. परिणामी, शालेय वाहने, ऑफिसकर्मी, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या गोंधळामुळे अपघाताची शक्यता सुद्धा वाढली आहे.

– महेश पोकळे यांनी वाहतूक विभागाला तातडीने पुढाकार घेऊन खालील उपाययोजनांची विनंती केली आहे:

– पंपाजवळील वाहतूक प्रवाहाची तपासणी आणि व्यवस्थापनासाठी स्वतंत्र यंत्रणा



नेमणे

– वाहने रस्त्यावर उभी राहू नयेत यासाठी कठोर नियमावली आणि अंमलबजावणी

– पर्यायी मार्ग अथवा वाहनांच्या पार्किंगसाठी जागेची उपलब्धता शोधणे

– स्थानिक नागरिक व वाहतूक विभाग यांच्यात समन्वय बैठक आयोजित करणे

विशेष म्हणजे, या निवेदनासोबत नागरिकांच्या

### तातडीने उपाययोजना करावी, ठाकरे गटाचे पोलिसांना निवेदन

सह्यांचे समर्थनपत्र देखील जोडण्यात आले असून, यावर सिंहगड रोड वाहतूक विभागाचे ठाणे अंमलदार यांनी अधिकृत स्वाक्षरी करत निवेदन स्वीकारले आहे.स्थानिक जनतेचा या मागणीला मोठा पाठिंबा असून, आता प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देत ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा आहे. येत्या काही दिवसांत वाहतूक सुधारण्यासाठी प्रशासन काय निर्णय घेते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

बेशिस्त वाहन चालकांना लगाम कधी लागणार?

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात आरटीओच्या फ्लाइंग स्क्वॉडने नोंदवलेल्या गुन्ह्यांच्या आकडेवारीकडे नजर टाकली तर तब्बल ६४ हजार बेशिस्त वाहन चालकावरती दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. वाहतूक नियमांचे भंग करण्यात सर्वाधिक प्रमाणात हेल्मेट न घालणाऱ्यांवर कारवाई झाली.

सार्वजनिक ठिकाणी नियम मोडणे आणि रस्त्यावर गोंधळ घालणे ही स्थिती अधिक धोकादायक आहे. हेल्मेट न घालणे (१९,६४५ प्रकरणे) आणि वेगमर्यादा ओलांडणे (१३,८१७ प्रकरणे) ही दोन प्रमुख कारणे अपघातांना आमंत्रण देतात. याशिवाय, अवैध विमा (८,७४४) आणि फॅन्सी नंबर प्लेट (३,५८०) यासारख्या नियमांचे उल्लंघन सर्रास होताना दिसत आहे.यात वेगमर्यादा ओलांडणे, हेल्मेट न घालणे, सीट बेल्ट न वापरणे, अवैध विमा, सिग्नल तोडणे, चुकीचे पार्किंग, जास्त भार वाहतूक, गाडी चालवताना मोबाईल वापरणे, रिफ्लेक्टरशिवाय वाहन, टेल लॅम्प/ब्रेक लाइट निकामी, तीन जण दुचाकीवर बसणे, फॅन्सी नंबर प्लेट अशा अनेक प्रकारच्या गुन्ह्यांचा समावेश आहे.

cmyk